सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १९१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### कफ सिरप कंपनीचा परवाना तामिळनाडू सरकारकडून रद्द



मुंबई : तामिळनाडू सरकारने कोल्ड्रिफ कफ सिरप बनवणारी कंपनी श्रीसन फार्मास्युटिकल्सचा उत्पादन परवाना पूर्णपणे रद्द करत, कंपनी कायमची बंद करण्याची घोषणा केली. श्रीसन फार्मा कारखान्यात ३५० हून अधिक गंभीर अनियमितता आढळल्या. कोल्ड्रिफ सिरप प्यायल्याने मध्य प्रदेशात आतापर्यंत २५ मुलांचा मृत्यू झाला. चेन्नईतील अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी श्रीसन फार्माशी संबंधित सात ठिकाणी छापे टाकले. श्रीसन फार्माचे प्रमुख कर्मचारी आणि तामिळनाडू अन्न आणि औषध प्रशासन (टीएनएफडीए)चे अटक केलेले प्रभारी संचालक पी. यू. कार्तिकेयन यांच्या जागेवरही छापे टाकण्यात आले. कार्तिकेयन यांना जुलै २०२५ मध्ये लाचखोरीच्या प्रकरणात अटक करण्यात आली होती. भेसळयुक्त कोल्ड्रिफ सिरपच्या उत्पादन आणि विक्रीशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या संदर्भात पीएमएलए अंतर्गत ईडीकडून कारवाई केली. दरम्यान, मध्य प्रदेश पोलीस रविवारी मुख्य आरोपी, श्रीसन फार्माचे मालक रंगनाथन गोविंदन यांना घेऊन तामिळनाडूला रवाना झाले. त्यांना ९ ऑक्टोबर रोजी चेन्नईमधून अटक करण्यात आली होती.

### सरकारी कर्मचारी आता झोहो ईमेल प्लॅटफॉर्मवर

मुंबई : पंतप्रधान कार्यालयासह केंद्र सरकारमधील सुमारे १२ लाख कर्मचाऱ्यांचे ई-मेल पत्ते आता राष्ट्रीय माहिती केंद्राच्या यंत्रणेतून तामिळनाडूच्या झोहो या खासगी कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर स्थलांतरित करण्यात आले आहेत. हे स्थलांतर केंद्र सरकारच्या डिजिटल स्वावलंबनाच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे, अशी माहिती सूत्रांद्वारे देण्यात आली आहे. सरकारी कर्मचारी पूर्वी विविध ओपन सोर्स टूल्स वापरत होते, ज्यामुळे फाइल्सची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता होती. हे लक्षात घेऊन आता झोहो ऑफिस सूट अधिकृतपणे कार्यान्वित करण्यात आला असून, त्याचा वापर वर्ड डॉक्युमेंट्स, स्प्रेडशीट्स आणि प्रेझेंटेशन तयार करण्यासाठी केला जाईल. झोहोचा हाच सूट पूर्वीपासून उपलब्ध होता, मात्र त्याचा वापर कमी प्रमाणात होत होता.

### मुंबईतील दस्त नोंदणीसाठी महसूल विभागाचा निर्णय!

मुंबई: महाराष्ट्राच्या महसूल विभागाने मुंबईतील नागरिकांना आणि व्यावसायिकांना मोठी 'दिवाळी भेट' दिली आहे. यापुढे मुंबई शहर आणि उपनगरमधील कोणत्याही मुद्रांक शुल्क कार्यालयात क्षेत्रीय मर्यादेची अट न ठेवता दस्त नोंदणी करण्याची परवानगी देण्यात आली आहे. यामुळे 'वन डिस्ट्रिक्ट वन रजिस्ट्रेशन' या धोरणाकडे आणखी एक पाऊल टाकण्यात आले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला असून, त्या संदर्भातील राजपत्र देखील जारी करण्यात आले आहे. पूर्वी मुंबईत दस्तऐवज नोंदणी करण्यासाठी नागरिक ज्या भागात राहत होते किंवा ज्या भागात मालमत्ता होती, त्याच क्षेत्रातील विशिष्ट मुद्रांक कार्यालयात जाणे बंधनकारक होते. आता ही अट रद्द करण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरातील नागरिक आता खालील सहा प्रमुख मुद्रांक कार्यालयांत आपला मालमत्ता करार, भाडे करार, वारसा हक्कपत्र तसेच अन्य महत्त्वपूर्ण कागदपत्रांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करू शकतील.

# सागरी विकासाची नवी दिशा! 'इंडिया मेरीटाईम वीक'मुळे महाराष्ट्राला जागतिक ओळख

## २७ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान नेस्को, गोरेगाव येथे 'इंडिया मेरीटाईम वीक'चे आयोजन

मुंबई : भारतीय सागरी क्षेत्राच्या विकासासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारने मुंबई येथे कायमचे केंद्र उभारावे. महाराष्ट्र या केंद्राचा जागतिक स्तरावर विकास करण्याबरोबर इंडिया मेरीटाईम वीक ही थीम जागतिक स्तरावर निर्माण करेल, असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मंत्रालयात आयोजित बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' च्या आयोजनाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, उपमुख्यमंत्री अजित पवार, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. २७ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नेस्को एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव येथे इंडिया मेरीटाईम वीक २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भेट देणार आहेत. तर



केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मुंबईमध्ये आर्थिक विकासाच्या मोठ्या संधी असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाच्या विकासात महाराष्ट्राचा वाटा नेहमीच महत्वाचा राहिलेला आहे. इंडिया मेरीटाईम वीक २०२५ च्या निमित्ताने देशासह राज्याच्या सागरी विकासात मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. सागरी गुंतवणुकीसाठी राज्यात पोषक वातावरण असून या 'मेरीटाईम वीक' मुळे त्यास आणखी चालना मिळेल. जागतिक सागरी क्षेत्रामध्ये देश आणि महाराष्ट्र एक नवी ओळख निर्माण करत आहे. जहाजबांधणी धोरणामुळे राज्यात या क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. देशाच्या सागरी क्षेत्राच्या विकासात महाराष्ट्र नक्कीच महत्त्वाची भूमिका बजावेल. महाराष्ट्र सागरी क्षेत्रात एक नवा अध्याय लिहित आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट थॅारिटीने क्षमतावाढ केली आहे. तर नवीन वाढवण बंदरामुळे विकासाच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'इंडिया मेरीटाईम वीक २०२५' च्या आयोजनाचा मान महाराष्ट्राला दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानतो. महाराष्ट्र शासन हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सहकार्य करेल. हा कार्यक्रम भव्य आणि जागतिक दर्जाचा होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल म्हणाले की, 'मेरीटाइम वीक' सारख्या कार्यक्रमांसाठी मुंबई हे योग्य ठिकाण आहे. महाराष्ट्रात सागरी क्षेत्रात गुंतवणुकीसाठी मोठ्या संधी आहेत. त्याचा लाभ देशातील उद्योगांना व्हावा. महाराष्ट्राचे सागरी क्षेत्रातील स्थान महत्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्रीय बंदरे, जहाज आणि जलमार्ग मंत्रालय आणि इंडियन पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारताचे सागरी धोरण, नवोन्मेष, शाश्वत विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समुद्री उद्योग क्षेत्रातील वाढ यावर चर्चा आणि प्रदर्शन करण्याचे हे एक व्यासपीठ ठरणार आहे. यामध्ये अनेक उपप्रकल्प, चर्चासत्र आणि थीम असतील. या कार्यक्रमास १०० पेक्षा जास्त देश, हजारो प्रतिनिधी आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय उद्योग सहभागी होणार असून ५०० हून अधिक प्रदर्शकांसह ७ सहयोगी देशांच्या मंत्रीस्तरीय प्रतिनिधींची उपस्थिती असेल.

# नोव्हेंबरपासून तीव्र थंडीचा अंदाज

मुंबई : राज्यातून मान्सून माघारी परतलाय, पण ऑक्टोबर हीटमुळे सध्या अंगातून घामाच्या धारा निघत आहे. पहाटे हवेत प्रचंड गारवा जाणवायला लागलाय. तर दुपारी कडाक्याचे ऊन पडलेले असते. परंतु, दिवाळीनंतर राज्यात थंडीची लाट येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ला निना तापमानात प्रचंड घट होऊन यंदा तीव्र हिवाळा जाणवणार असे हवामान विभागाने सांगितले आहे.



सध्या दिल्ली एनसीआरमध्ये कडाक्याची थंडी पडायला सुरूवात झाली आहे. हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमधील उंच भागात बर्फवृष्टी सुरू झाली आहे. त्यामुळे दिल्ली आणि उत्तरेकडील मैदानी भागातही तापमान घट होतेय. त्यामुळे यंदा लवकर हिवाळ्याला सुरूवात होईल, असा अंदाज आहे. सध्या हिमाचल प्रदेश आणि पंजाब या दोन्ही ठिकाणी तापमानात घट झाली. मध्य आणि पूर्व पॅसिफिक महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात घट झाल्यामुळे ला निना परिस्थिती निर्माण झाली आहे, याचा परिणाम हवामानावर होईल, असे हवामान तज्ज्ञांनी सांगितले.

ऑक्टोबर अखेरनंतर 'ला निना'चा प्रभाव सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अतिप्रमाणात थंडीचा अंदाज मांडण्यात येत आहे. आयएमडीचा अंदाज आहे की, काही दिवसात ला निना प्रभाव सुरू होईल. या थंडीची तीव्रता नेमकी किती असेल, याचा अंदाज नोव्हेंबरमध्येच येणार आहे. जर ला निना प्रभाव ऑक्टोबरमध्ये सक्रिय झाला तर डिसेंबर आणि जानेवारीत तापमान अति प्रमाणात कमी होऊ शकते.

# पीएफ खात्यातून १००% रक्कम काढण्याची परवानगी : ईपीएफओ

नवी दिल्ली: कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने सात कोटींहून अधिक सदस्यांना मोठा दिलासा दिला आहे. ईपीएफओच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाने आंशिक पीएफ काढण्याच्या नियमांमध्ये मोठे बदल करत, सदस्यांना त्यांच्या गरजेनुसार पात्र शिल्लक रकमेच्या १००% पर्यंत पैसे काढण्याची परवानगी दिली आहे. या निर्णयामुळे सदस्यांसाठी ईपीएफओच्या सेवा अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक होणार आहेत.

**१००% पर्यंत पैसे काढण्याची मुभा**

आंशिक पैसे काढण्यासाठी असलेले १३ क्लिष्ट नियम एकत्र करून आता फक्त तीन श्रेणींमध्ये - आजारपण, शिक्षण, विवाह; ; आणि Special Circumstances) आणले आहेत. सदस्य आता कर्मचारी आणि नियोक्ता या दोन्हीच्या योगदानासह त्यांच्या पीएफ खात्यातील पात्र शिल्लक रकमेपैकी १००% पर्यंत रक्कम काढू शकतात.

शिक्षणासाठी १० पट आणि विवाहासाठी ५ पट पर्यंत पैसे काढण्याची मर्यादा आता निश्चित केली आहे. (पूर्वी या दोन्हीसाठी मिळून केवळ ३ वेळा आंशिक पैसे काढण्याची परवानगी होती.)

**सेवा कालावधीमध्ये घट**

कोणत्याही प्रकारच्या आंशिक पीएफ काढण्यासाठी आवश्यक असलेला किमान सेवा कालावधी आता एकसमान १२ महिने करण्यात आला आहे. (पूर्वी काही कारणांसाठी ५ वर्षांची अट होती.)

**विशेष परिस्थितीत कारण सांगण्याची गरज नाही**

'विशेष परिस्थिती' या श्रेणीअंतर्गत पैसे काढण्यासाठी आता सदस्यांना कोणतेही विशिष्ट कारण (उदा. नैसर्गिक आपत्ती, लॉकआउट, महामारी) देण्याची गरज राहणार नाही. यामुळे दावा नाकारला जाण्याची शक्यता कमी होईल.

**निवृत्ती निधीसाठी किमान शिल्लक**

सदस्यांच्या खात्यामध्ये नेहमी किमान २५% रक्कम शिल्लक ठेवणे अनिवार्य केले आहे. यामुळे सदस्यांना ईपीएफओच्या (सध्या ८.२५% प्रतिवर्ष) उच्च व्याजदराचा आणि चक्रवाढ व्याजाचा फायदा मिळत राहील, ज्यामुळे निवृत्तीसाठी चांगली बचत तयार होईल.

# मंत्रिमंडळाचे ३ मोठे निर्णय: २,२२८ नवी पदे, ५ लाख रोजगार, ५०० कोटींचा निधी!

## हायकोर्टात बंपर भरती; महाराष्ट्र बांबू धोरण २०२५ जाहीर; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संस्थेसाठी ५०० कोटींची तरतूद

मुंबई: महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज (१४ ऑक्टोबर) तीन महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले. उद्योग, सामाजिक न्याय आणि विधि व न्याय विभागांशी संबंधित या निर्णयामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार असून, ऐतिहासिक शैक्षणिक वारसा जपला जाणार आहे.

मुंबईसह राज्यातील उच्च न्यायालयांसाठी तब्बल २ हजार २२८ नवीन पदे निर्माण करणे, महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण २०२५ जाहीर करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'द पीपल्स एज्युकेशन सोसायटी'च्या विकासासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करणे हे प्रमुख निर्णय आहेत.

**न्यायव्यवस्थेत बंपर भरती: २,२२८ नवी पदे**

मंत्रिमंडळाच्या बैठकीत विधि व न्याय विभागाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबईतील मूळ शाखा, अपील शाखा तसेच नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठांसाठी गट 'अ' ते 'ड' संवर्गात एकूण २ हजार २२८ नवीन पदांची निर्मिती करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

न्यायालयीन कामकाजात गतीमानता आणण्यासाठी तसेच माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवण्यासाठी ही पदे आवश्यक होती. या निर्णयामुळे विधि व न्याय विभागातील मनुष्यबळाची गरज पूर्ण होणार असून, २ हजारांहून अधिक तरुणांना सरकारी नोकरीची उत्तम संधी मिळणार आहे. आज मंजूर झालेल्या पदांपैकी मुंबई मूळ शाखेसाठी ५६२, अपील शाखेसाठी ७७९, छत्रपती संभाजीनगर खंडपीठासाठी ५९१ आणि नागपूर खंडपीठासाठी २९६ पदांचा समावेश आहे. या पदनिर्मितीसाठीच्या वेतन अनुदानासह अनुषंगिक खर्चाच्या तरतुदीलाही मंजुरी देण्यात आली आहे.

**बांबू धोरणातून ५०,००० कोटींची गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार**

राज्यातील शेतकऱ्यांना नगदी पिकांसारखाच शाश्वत आणि पर्यावरणपूरक उत्पन्नाचा एक नवा पर्याय मिळावा यासाठी 'महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण २०२५-३०' जाहीर करण्यात आले. राष्ट्रीय बांबू मिशन आणि महाराष्ट्र मिशन २०२३ ला सुसंगत असलेले हे धोरण पुढील पाच वर्षांसाठी राबविले जाईल. या धोरणाच्या माध्यमातून पुढील १० वर्षांत राज्यात तब्बल ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येणे अपेक्षित आहे. या गुंतवणुकीतून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या ५ लाखांहून अधिक रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या धोरणाअंतर्गत राज्यात १५ समर्पित बांबू क्लस्टर्स (समूह) आणि दुर्गम भागातील कारागिरांसाठी सूक्ष्म सामायिक सुविधा केंद्रे स्थापन करण्यात येतील.

# गडचिरोली जिल्ह्यात तब्बल ६१ नक्षलवाद्यांनी केले आत्मसमर्पण

गडचिरोली : नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातून एक अत्यंत मोठी आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. जिल्ह्यातील तब्बल ६१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या मोठ्या घडामोडीमुळे नक्षलवादी चळवळीला (छुरश्र्ळींश चेंींशाशपीं) मोठा आणि निर्णायक धक्का बसला असून, ही चळवळ खिळखिळी झाल्याचे बोलले जात आहे. नक्षलवाद्यांनी मोठ्या संख्येने आत्मसमर्पण केल्यामुळे राज्य सरकारला आणि सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये नक्षलवादी चळवळीतील एक मोठे आणि महत्त्वाचे नाव समाविष्ट आहे. नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचे सदस्य सोनू ऊर्फ भुपती यांनीही आत्मसमर्पण केले आहे. केंद्रीय समितीचा सदस्य आत्मसमर्पण करणे हे नक्षलवादी चळवळीच्या नेतृत्वासाठी आणि संघटनेसाठी अत्यंत हानिकारक मानले जाते. गडचिरोली पोलिसांच्या 'पसरलेल्या' नक्षलविरोधी धोरणाचा हा एक मोठा परिणाम मानला जात आहे. नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात झालेले हे आत्मसमर्पण गेल्या अनेक वर्षांतील सर्वात मोठे आणि महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

# गोविंद पानसरे हत्या प्रकरणी हायकोर्टाकडून तिघांना जामीन; सर्वच्या सर्व '१२' संशयित आरोपींची सुटका!

कोल्हापूर : कोल्हापूर येथील ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणासंदर्भात आज एक मोठी आणि महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपींपैकी असलेल्या डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांनाही मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर येथील सर्किट बेंचकडून जामीन मंजूर झाला आहे. गोविंद पानसरे हत्या प्रकरणात आजपर्यंत एकूण १२ संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती. यापैकी ९ जणांना यापूर्वीच जामीन मंजूर झाला होता, मात्र डॉ. वीरेंद्र तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर हे तिघे जामीन न मिळाल्यामुळे कळंबा कारागृहात होते. आज (मंगळवार) या तिघांच्याही जामीन अर्जावर सर्किट बेंचकडून सुनावणी झाली आणि न्यायालयाने तिघांनाही जामीन मंजूर केला. या निर्णयामुळे कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील आजपर्यंतचे एकूण सर्वच १२ संशयीत आरोपींना आता जामीन मंजूर झाला आहे. या निकालामुळे पानसरे हत्या प्रकरणाच्या पुढील तपासावर आणि न्यायालयीन प्रक्रियेवर काय परिणाम होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**साडे नऊ वर्षांची भरपाई कोण करणार?**

तिन्ही संशयित हिंदुत्वनिष्ठांना जामीन मिळाल्यावर सनातन संस्थेने विचारले आहे की, निरपराध हिंदुत्वनिष्ठांची साडे नऊ वर्षांची भरपाई कोण करणार? पानसरे हत्या प्रकरणात निष्पाप हिंदुत्वनिष्ठांना अटक करण्यात आली होती आणि त्यांना साडे नऊ वर्षांचा कालावधी कारागृहात घालवावा लागला. या कालावधीत झालेले त्यांचे मानसिक, सामाजिक आणि आर्थिक नुकसान भरून काढण्याची जबाबदारी कोणाची, असा थेट सवाल संस्थेने केला आहे. डॉ. तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर यांना जामीन मंजूर झाल्यामुळे सनातन संस्थेने आनंद व्यक्त केला आहे, परंतु त्याच वेळी त्यांना झालेल्या त्रासाबद्दल सरकारकडे स्पष्टीकरण मागितले आहे. यामुळे आता जामीन मिळालेल्या संशयित आरोपींच्या अटकेच्या प्रक्रियेवर आणि तपासाच्या पद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२० फेब्रुवारी २०१५ रोजी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांची कोल्हापुरात त्यांच्या राहत्या घरी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. पानसरे यांच्या हत्येचा संबंध त्याच दरम्यान झालेल्या इतर विचारवंतांच्या हत्यांशी जोडला गेला होता.

### महाराष्ट्रात मंकी पॉक्सचा धुळ्यात पहिला रुग्ण

धुळे : जगभरात थैमान घालणाऱ्या मंकी पॉक्सचा राज्यातील पहिला रुग्ण धुळ्यात आढळून आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली. रुग्णाचे दोन्ही रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्याने हिरे रुग्णालय प्रशासनही सतर्क झाले आहे. मंकी पॉक्स हा संसर्गजन्य आजार असल्याने रुग्णाला स्वतंत्र विलगीकरण कक्षात दाखल करण्यात आले असून त्याच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी महापालिकेला कळविण्यात आले आहे. मंकी पॉक्स बाधित रुग्ण २ ऑक्टोबर रोजी सौदी अरेबियाहून धुळ्यातील गरीब नवाज नगर येथे आला होता. गेल्या चार वर्षांपासून तो सौदी अरेबियात वास्तव्यास आहे.

# किनवट : अनैतिक संबंधातून पतीचा खून - पत्नी व प्रियकरावर गुन्हा दाखल

किनवट (प्रतिनिधी) : अनैतिक संबंधातून पतीचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात पत्नी व तिच्या प्रियकराविरुद्ध खुनासह इतर गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, मथुरानगर, किनवट येथील विनोद किसन भगत (वय ५२) यांचा मृतदेह २ सप्टेंबर २०२५ रोजी महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत पैनगंगा नदीत सापडला होता. सुरुवातीला हा मृत्यू अपघाती असल्याचे समजले; मात्र तपासात या मृत्यूमागे अनैतिक संबंध आणि कटकारस्थान असल्याचे उघड झाले आहे.

तक्रारदार नंदा मारोती पाटील (रा. समतानगर, किनवट) यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, त्यांचा भाऊ विनोद भगत याची पत्नी प्रियंका हिचे शेख रफिक शेख रशीद (रा. साईनगर, किनवट) या इसमासोबत अनैतिक संबंध होते. प्रियंका हिने आपल्या ओळखीच्या शेख रफिकच्या मदतीने विनोद भगत यांच्या नावावर असलेले आरसीसी घर विकले होते. घर विक्रीच्या पैशांबाबत नेहमी वाद होत होते.

२९ ऑगस्ट २०२५ रोजी विनोद भगत अचानक बेपत्ता झाला. कुटुंबीयांनी शोधाशोध करूनही तो मिळाला नाही. अखेर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांनी सीडीआर तपास व चौकशी केली असता, संशयित शेख फयाज शेख अवजोदिन (रा. सुभाषनगर, किनवट) याच्या जबाबावरून संपूर्ण प्रकरण उघड झाले.

चौकशीत उघड झाले की, प्रियंका भगत हिने तिच्या प्रियकर शेख रफिक याच्यासोबत कट रचून, विनोद भगत यांना दारू पाजून खरबी पुलाजवळील पैनगंगा नदीच्या प्रवाहात ढकलून दिले. त्यामुळे विनोद भगत यांचा पुराच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला. त्यानंतर आरोपींनी ही घटना लपवून ठेवली आणि पुरावे नष्ट केले.

या प्रकरणी शेख रफिक शेख रशीद (वय ४३, रा. साईनगर, किनवट) आणि प्रियंका विनोद भगत (वय ४१, रा. मथुरानगर, किनवट) या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१), २३८(अ)(क), ६१(२), १४०(१) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३(२)(व्ही) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने किनवट परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### व्हीव्हीपॅटवरून रणकंदन!

मुंबई : महाराष्ट्रातील प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आज राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आयोगाच्या कारभारावर त्यांनी गंभीर आक्षेप घेतले. विरोधकांनी सवाल केला आहे की, जी निवडणूक २०२२ मध्ये व्हायला हवी होती, ती आता २०२६ मध्ये होतेय. या चार वर्षांत आयोगाने कोणती तयारी केली? हजारो कोटी रुपये खर्च करून मागवलेले व्हीव्हीपॅट नेमके कुठे आहेत? सामान्य जनतेचा ईव्हीएमवर विश्वास नाही, आणि व्हीव्हीपॅट हेच त्यांच्या विश्वासाचं एकमेव माध्यम आहे. त्यामुळे, व्हीव्हीपॅटचा वापर अनिवार्य असावा, ही त्यांची ठाम मागणी आहे.



बुधवार, दि. १५ ऑक्टोंबर २०२५

www.tarunbharat.net
तरुण भारत

# साहित्य-संस्कृती

२

## निसर्गभान

# संधिकाली या अशा



● वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

**सूर्य चालला अस्ताचली**
**हलके अंधारले नभांगण.**
**उमलता पाकळी पाकळी**
**आसमंती सुगंधाची पखरण.**
**पूर्णचंद्राचे नभी अवतरण**
**उल्हसित करीत कणकण.**

हवेतला सुखद गारवा पांघरलेल्या सागवानाच्या पानापानातून प्रकाशाचा झोत हलकेच झिरपत होता. किंचित केशरी छटा लेवून तो हळूहळू आकाशात वर चढू लागला. केशरी प्रकाशाचा संपूर्ण गोल बघता-बघता समोर आला आणि पौर्णिमेच्या पूर्णचंद्राने मनामनात चांदणे शिंपले.

हा रजनीनाथ काळ्या नभाचा राजा पौर्णिमेला मनावर गारूड करतो. त्याचे अवर्णनीय सौंदर्य शब्दात समोर आणणे केवळ अशक्य आहे. पौर्णिमेचा चंद्र सगळ्यांना खुणावतो. कधी ढगांच्या पडद्याआडून त्याचे रश्मीदूत खुणावतात, कधी डोंगरामागून हलके हलके वर येतात, तर कधी शांत जलाशयावर प्रतिबिंब रेखत प्रेमसंदेश देतात. शांत, शीतल दुधाळ प्रकाशाची झळाळी मनाला प्रसन्न करणारी... उल्हासित करणारी... सुखावणारी... चंद्र बागेतल्या सागवानाच्या एका फांदीवर तेजस्वी फुलासारखा उगवला. पण तो खट्याळ एका ठिकाणी शांत कसला बसतोय्?

**सागाच्या झाडाला तेजाचे फूल लागले**
**झाड तेव्हा लहानसे मूल होऊन नाचले.**
**फुलाने फांदी फांदीवर खूप झोके घेतले**
**अन् मायेच्या पाशाला हलकेच दूर सारले.**

रात्रभर त्याची फिरस्ती अन् दुसऱ्या दिवशीपासून आकार घटत पंधरा दिवसांनी आकाशात त्याचा मागमूस नाही. नंतर हलक्या पावलांनी आणि नाजूक कोरीपासून वाढत हळूहळू पौर्णिमेला प्रभावी अस्तित्वाने परत आपलं साम्राज्य पसरणार. का रे इतका खोडसाळपणा, रजनीनाथा? रोज वेगळा डौल? आणि सगळीच रूपं किती लडिवाळ!

चंद्राच्या कला आणि त्यानुसार कालगणना हे आपल्याला ओळखीचं विज्ञान असलं तरी, आपण मात्र चंद्राच्या देखण्या रूपाच्या प्रेमात बुडतो. आश्विन पौर्णिमेला चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो. कोजागरीच्या रात्री चंद्रप्रकाशात आटवलेल्या दुधात पूर्णचंद्राचे प्रतिबिंब पाहून मग 'को जागर्ति?' विचारणाऱ्या लक्ष्मीला नैवेद्य दाखवतात.

**चंद्रकिरणे मनात झरली, सुखद मन स्पंदन**
**सरत्या जाईजुई अन् चमेली गंधाळते क्षण.**
**हवेतून सुखद गारवा, बागेत जमले मित्रगण**
**मैफिल रंगतदार, हास्य-विनोद अन् गायन**
**मेवेदार मसाला दूधातून चंद्रकिरणांचं प्राशन.**

आश्विन कृष्ण चतुर्थीच्या दिवशी विवाहित स्त्रिया करवाचौथचे व्रत पतीचे दीर्घायुष्य व समृद्धीसाठी करतात. दिवसभर उपवास आणि चंद्रोदयानंतर चाळणीतून मोहक चंद्राचे दर्शन व नंतर प्रेमपूर्वक आपल्या पतीचा चेहरा पाहतात. आश्विन अमावास्येस प्रदोषकाळी लक्ष्मीपूजन केले जाते, तर कार्तिक शुद्ध द्वितीयेला संध्याकाळी बहीण नाजूक चंद्रकोरीला व नंतर भावाला ओवाळते. बहीण-भाऊ, पती-पत्नी, सखे-सवंगडी या सगळ्या नात्यांना रेशमाच्या मखमली धाग्यांनी घट्ट गुंफत निसर्गाच्या सान्निध्यात नेणाऱ्या या चंद्रकला अन् हे सण!

ती वटपौर्णिमा होती. मानस सरोवराच्या काठावर सूर्यास्त आकाशात केशराची उधळण आणि त्याचं प्रतिबिंब मानस सरोवराच्या पाण्यातून मावळताना त्याचं रेंगाळणं नभाचं रंगणं बघत आम्ही दोघेच निःशब्द मावळत्या सूर्याचा निरोप घेत होतो. हिमाच्छादित डोंगरांच्या मागे सूर्य हळूहळू लपला आणि दिशा सावळल्या. आम्ही परत फिरलो अन् बघतच राहिलो मागच्या डोंगरामागून शुभ्र प्रकाशकिरणे! नजर तिथून हलेचना. चंद्रोदय! अंधारावर निळसर झाक असलेल्या नभांगणी पाच मिनिटातच तो विशाल, गुलाबसर पूर्णचंद्र दाखल झाला. दुधाळ प्रकाशाने आसमंत व्यापलं.

मानसरोवराच्या आजूबाजूला डोंगरांची तटबंदी आहे. कमी उंचीची अधूनमधून बर्फाच्छादित शिखरे, त्यांच्या मागे उंच हिमाच्छादित डोंगरांचे भव्य तट! मानसरोवराच्या उत्तरेला शुभ्र बर्फाच्छादित कैलास पर्वत! त्याच्या बाजूला नंदी पर्वत, समोर शंखसदृश हिमावरण तर कैलास पर्वतावर मला जाणवलेला बर्फाचा ॐ! सरोवराकाठचा अनुभव तर अद्वितीयच! शांत मानस सरोवर समोरचा काठही दिसत नाही, एवढे अथांग निळे पाणी गडद तर कुठे हलक्या निळ्या रंगाच्या पाण्याच्या चमचमत्या लाटा, काठावर पोचणाऱ्या लाटांचा झुळूक झुळूक आवाज, समोर भव्य कैलास पर्वत आणि सूर्यास्तामुळे आकाशात केशराची उधळण. त्या मंतरलेल्या वातावरणातला तो चंद्रोदय माझ्या आठवणीतली ती अविस्मरणीय पौर्णिमा आहे.

अतिशय कडाक्याच्या, गोठवणाऱ्या थंडीत रात्रभर सरोवराच्या काठावर बसून बघितलेले लखलखत्या ताऱ्यांचे आकाश, सरोवराच्या पाण्यावर त्यांचे चमचमते कवडसे! पहाटे चंद्र सरोवरावर होता आणि लाटांवर नाचणाऱ्या त्याच्या किरणांनी लाटांना चंदेरी काठ दिले. काठाकडे येताना लाटेने योग्य उंची गाठली, की त्या रूपेरी कडांच्या लाटा छोट्या तारकांमधून फुटलेला चांदणचुरा ल्यायलेल्या दिसत होत्या. लाटांवर चंद्र प्रकाशाचे नृत्य अद्वितीय दृश्य होते. त्या दिवशीचा सूर्यास्त आणि चंद्रोदय यांनी मंत्रमुग्ध केले.

**संधिकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा**
**चांद येई अंबरी, चांद राती रम्य या!**

अशा रम्य संधिकाली मानसरोवराकाठी या अतिशय शांत भारलेल्या वातावरणात आम्ही दोघे भारावलेले!



# गावाकडची शेकोटी

## गावगाडा

● अखिल देशपांडे
९७६७१५१८३०

परतीचा पाऊस झाला की मग चाहूल लागते ती हिवाळ्याची. वातावरण बदलास सुरुवात होते, निसर्ग आपले चक्र कधीच बिघडू देत नाही. चंद्रपूर जिल्हा म्हणजे धान पिकाने समृद्ध असलेला प्रसिद्ध भूभाग. उत्तम प्रतीचा तांदूळ या भागात पिकतो, त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात राईस मिल हा उद्योग पहायला मिळतो. याच राईस मिलच्या माध्यमातून धानावर प्रक्रिया केली जाते व तांदूळ आणि टरफले वेगळी केली जातात. याच टरफलांचे अक्षरशः डोंगराएवढे ढिगारे राईस मिलच्या आवारात तयार होतात आणि मग थंडीच्या दिवसांत गावकरी हा कोंडा पोत्यात भरून घरी आणतात व त्याची शेकोटी करतात. लहानपणी आम्ही बच्चे कंपनी या कोंड्याच्या ढिगाऱ्यावर खूप धमाल करायचो. पूर्वी घरासमोरील अंगणात शेकोटीची एक जागा ठरलेली असायची. त्याच जागेवर हा कोंडा पसरवला जायचा आणि चुलीतील लाल भडक निखारे या पसरवलेल्या कोंड्यावर एक छोटासा खोलगट भाग करून टाकले जायचे. इतर शेकोट्यांपेक्षा या कोंड्याच्या शेकोटीचे एक वेगळे महत्त्व आहे. हा कोंडा एकदम जळत नाही, रात्रभर थोडा थोडा जळत असतो. त्यामुळे रात्री पेटवलेल्या शेकोटीची ऊब पहाटेच्या थंडीतही घेता येते. याच्या धुरामुळे डासांचा त्रासही कमी होतो. याच शेकोटीभोवती रात्री उशिरापर्यंत कुटुंबातील सदस्यांच्या गप्पा रंगायच्या, घरातील कर्ता पुरुष दिवसभराच्या कामाचा आढावा याच शेकोटीपुढे घेत असे. भाज्या चिरण्यासारखी छोटी मोठी कामे महिलावर्ग इथेच करायचे, शाळकरी मुलांचा अभ्यासही याच शेकोटीभोवती असायचा, दिवसभराच्या कामाचा थकवा या उबदार शेकोटीने केव्हा निघून जायचा, हे कळायचे देखील नाही. दुसऱ्या दिवशीच्या कामाचे नियोजनही याच शेकोटीभोवती व्हायचे. आता पूर्वीसारखी शेकोटी अनुभवता येत नाही. पण, गावाकडच्या जुन्या शेकोटीच्या आठवणी आजचा हिवाळा उबदार करून जातात.

## आठवणी

# सोन्याचं सोनं, एकच काडी आणि उष्टी हळद/तीन 'अलक'

● प्रकाश एदलाबादकर
९८२२२२२११५

तसे आज काही काम नव्हते. दुपारी एक कादंबरी वाचत होतो. वाचता वाचता कंटाळा आला. पुस्तक बंद केले. बाल्कनीत आलो. गारठा वाढला होता. शाल लपेटून बसलो. कादंबरी फ्लॅश बॅक पद्धतीने लिहिलेली होती. कथानक डोक्यात भिनले होते. मग मीसुद्धा उगाचच जुन्या गोष्टी आठवत बसलो. तिन्ही सांजेची वेळ उंबरठ्यावर होती. तेवढ्यात हीसुद्धा गरमागरम कॉफीचा मग घेऊन बाल्कनीत आली. गप्पांच्या ओघात तिला ज्या तीन गंमती मी सांगितल्या, त्याच तुम्हालाही सांगतो. माझ्या या आठवणी, मी चौथी-पाचवीत असतानाच्या (१९५७-५८) आहेत. मूळ नावे मात्र लिखाणात बदलली आहेत.

आमच्या बाबांची एक मावशी होती. तिला दोन मुले. मनूकाका आणि नानाकाका. जुना जमाना होता! ही मावशीआजी सुनांना खूप फटकळपणे बोलत असे आणि छळतही असे. नानाकाका मोठे होते. मनूकाका लहान. नानाकाकांची बायको बिचारी खूप अबोल, सहनशील होती. गरिबाघरची होती. ती मावशीचा जाच सहन करी. आजी तिला खूप घालूनपाडून बोली. आम्ही एखादवेळेस आईसोबत जात असू तेव्हा मोठी सुमाकाकू आईजवळ डोळे गाळीत बसे. आपले मन मोकळे करी. (जवळपासच्या नातेवाईकांकडे सहज म्हणून गप्पा मारायला जायची त्यावेळी पद्धत होती. आपपरभाव आणि तुसडेपणा नव्हता.) दुसरे म्हणजे, या सुमाकाकूच्या लग्नाला १२ वर्षे झाली होती, तरी तिला अपत्य नव्हते, तेही एक दुःख. त्यावरूनही आजी बोलत असे. लहान नंदाकाकू मात्र आजीला जुमानत नसे. ती त्याकाळची ग्रॅज्युएट होती, मॉडर्न होती. ती आजीला जशास तसे उत्तर देई. आजी तिच्या वाट्याला जास्त जात नसे.

कालांतराने सुमाकाकूवर देव प्रसन्न झाला. तिला मुलगा झाला. खूप गोंडस आणि गोरापान. लहान्या नंदाकाकूला दोन मुलीच होत्या. नातवाचं तोंड पाहायला मिळालं म्हणून मावशी आजीला खूप आनंद झाला. म्हातारी त्याचे खूप लाड-कोड करी. त्याला मांडीवर घेऊन बसे आणि त्याचे कौतुक करी... आता सुमाकाकूंचे आणि आजीचे पटत नसे, पण नातवाचे कौतुक तर करायचे. मग म्हातारी काय म्हणत असे ठाऊक आहे? ती म्हणे...

माझ्या सोन्याचं सोनं,
माझ्या घुबडीचं तान्ह
माझ्या सोन्याचं सोनं,
माझ्या घुबडीचं तान्ह

माझं सोनं म्हणजे माझा मुलगा आणि त्याचं सोनं म्हणजे नातू! पण तान्ह कोणाचं?...

आहे की नाही कमाल? मावशीआजीच्या काव्यप्रतिभेला माझा सलाम.

* * * * *

माझी एक काकू होती. बाबांच्या एका चुलत भावाची बायको. तिच्या तोंडी खूप म्हणी होत्या. बोलताना ती त्यांचा सहज वापर करी. हसतहसत उपहासात्मक बोलण्यात ती तरबेज होती. एकदा आईने मला तिच्या घरी डबा नेऊन द्यायला सांगितले. आईने सहज म्हणू बेसनाचे लाडू केले होते. त्यातले चार-पाच काकूंकडे दिले. काकूने डब्बा उघडला. माझ्याकडे बघत म्हणाली, काहून रे चिमूटभर बेसनाचे लाडू केले काय तुझ्या मायनं? पाचच गोळ्या धाडल्या? येथं खाणारे सहा. कोणाले पुरते हे? हे त म्हणजे असं झालं का, आडजीभ खाये आन पडजीभ वाट पाह्ये.



काकूकडची परिस्थिती तशी बेताचीच होती. माझा भाऊ कुठल्या तरी सोसायटीत बाबू होता. वहिनी बिचारी टुकीने आणि काटकसरीने संसार करी. एक दिवस मी सकाळी सकाळीच काकूंकडे गेलो. आईचा काहीतरी निरोप घेऊन. नुकतेच सगळे उठलेले होते. वहिनीने आगपेटीची एक काडी उजळून देवाजवळ दिवा लावला. (अधिकाचा महिना होता, अधिकात सकाळी देवासमोर दिवा लावावा म्हणतात) त्या दिव्यावर कागद पेटवून चूल पेटवली. त्या चुलीत दुसरा कागद घालून त्याने अंघोळीच्या पाण्यासाठी बंब पेटवला. बंबात कागद घालून त्याने अंगणातला कचरा जाळला. हे कशाला तर, आगपेटीच्या काड्या उगाच संपू नये म्हणून. मी वहिनीच्या उलट निरोपाची वाट बघत असतानाच काकू तिथे आली. कमरेवर हात ठेवून वहिनीकडे हात दाखवत मला म्हणाली, पाह्यलं, माझी सून कशी आहे... एका काडीनं सगळं घर पेटवते.

आहे की नाही खासच? काकूच्या ज्वालाग्राही प्रतिभेला मी आजही मनोमन नमस्कार करतो..

* * * * *

आता

आता गोष्ट एका लग्नातली. माझा एक आत्येभाऊ होता. त्याचे लग्न ठरले. पासष्ट-सत्तर वर्षांपूर्वीचे नागपूर. त्यावेळी नागपुरात एवढ्या मोठ्या संख्येने मंगल कार्यालये नव्हती. महालात चिटणीसांचा वाडा, भोसला वेदशाळा, जामदार मंदिर किंवा अन्य मोठी मंदिरे, तर बर्डीला नानिवडेकर मंगल कार्यालय आणि अमरज्योती. त्याकाळी पश्चिम नागपुरात मंगल कार्यालये होती की नाही मला स्मरत नाही. धरमपेठेतील जोशी मंगल कार्यालय व आशा मंगल कार्यालय हे साठच्या दशकातील असावेत. उन्हाळ्यातील बरीचशी लग्ने शाळांमधून होत. उन्हाळ्याच्या सुटीत शाळा रिकाम्याच असत. अन्यथा काही कुटुंबे घरासमोरच मंडप टाकीत.

विवाहस्थळ : आमचे राहते घरी, अशी सूचना पत्रिकेत असे.

तर ते असो. आमच्या आत्येभावाचे (त्याला आपण पुढे सदुदादा म्हणू) राहणे बर्डीवर होते. आमचा परिवारही बर्डीवरच राहत असे. वधूपक्ष महालातील होता, संघबिल्डींग जवळच्या एका वाड्यातला होता. वधूपक्षाने महालातील भोसला वेदशाळेत वरपक्षाचा जानोसा ठेवला होता आणि लग्नही तिथेच होते. लग्नाचा मुहूर्त चांगला साडे दहा-अकराचा होता. लग्नाच्या दिवशी सकाळी वधूपक्षाकडून वाजतगाजत उष्टी हळद आली. सदूभाऊला घरातील आयाबहिणींनी सांगितले. मंडपात चौरंग मांडला. पारोसा सदुदादा आपला उघडाबंब, पट्ट्यापट्ट्याची चड्डी घालून चौरंगावर बसला. मुलीकडच्यांनी त्याला हसतखिदळत तेलमिश्रित हळद चोपडली. मूळचा खास देशस्थी पक्का रंग असलेला काळा-सावळा सदुभाऊ हिरवा दिसायला लागला. डोक्यापासून बेंबीपर्यंत हळद चोपडून झाली. थोडासाच पोर्शन शिल्लक होता...

आणि वधूपक्षाकडील एक बारा-तेरा वर्षांची परकरी पोर आपल्या आईच्या कानात जरा मोठ्यानेच कुजबुजली, अगं आई हा आपला नवरा मुलगा नाहीये.

चूप बस तुला काय माहिती? तिची आई डाफरली. अगं खरंच. मावशीला पाहायला आले होते न तेव्हा मी होती न तिथे. तूसुद्धा कुठे आली होती यवतमाळवरून? आणि या कुणीच नव्हत्या. इतर महिलावर्गाकडे हात दाखवून ती म्हणाली, आपला नवरदेव चांगला उंच, गोरापान आणि सरळ नाकाचा आहे. मी पाहिलं न त्याला...

झाऽऽऽऽलं, एकच गोंधळ उडाला. विचारपूस झाली, चौकशा झाल्या आणि कळले की, त्या उष्टी हळद आणणाऱ्या मायभगिनींना चुकीची माहिती मिळाली होती. सदूभाऊला भलत्याच पोरीची उष्टी हळद लागली होती. त्या आलेल्या महिला वर्गाला बिचाऱ्यांना खूपच कानकोंडी (मुद्दाम नागपुरी शब्द वापरला) झाले. त्या खालमानेने निघून गेल्या.

मग काय विचारता! बेंबीपर्यंत हिरवा पडलेला सदुदादा चौरंगावर उभा राहून थयथयाट करायला लागला . कोणत्याच्या पोरीची हळद लागली मला. तिच्या...ला!! चौकशी नाही का करायची? कुणाच्याही मांडवात घुसतात...ले. घरच्यांनाही समजलं नाही काय? कुठे गेली होती अक्कल खायला? सद्दादाचे हे मंत्रयुक्त स्वगत सुरू असतानाच, त्याने बाजूच्या तट्ट्याची काडी काढून अंगाला लागलेली सगळी हळद खरवडून काढली...

...आणि संतापलेला सदूदादा अंघोळीला जाणार तेवढ्यात खऱ्या वधूची उष्टी हळद वाजतगाजत आली. पट्ट्यापट्ट्याच्या चड्डीतला सदूदादा पुन्हा हळदीचा लेप लावायला चौरंगावर बसला. आमच्या आत्याने आणि इतर ज्येष्ठ महिलांनी त्याची समजूत काढली. पुढे लग्न निर्विघ्नपणे पार पडले. परंतु, सदूदादाची उष्टी हळद हा किस्सा पुढे बरेच दिवस आमच्या नातेवाईकांत चर्चेचा किस्सा ठरला. आज सदूदादा नाही आणि वहिनीही नाही. परंतु, त्यांची उष्टी हळद मात्र चिरंजीव आहे.

## मन्याच्या काव्या

# मध्यरात्रीच्या बाजारात मी

● मनोज वैद्य
९८२२९४९२६०

'अहो, ही बातमी वाचली का? महाराष्ट्र सरकारने आता दिवस रात्र दुकाने सुरू ठेवायला परवानगी दिली आहे म्हणे...किती छान हं...' पटकन तिच्या हातून पेपरचे ते पान जवळजवळ मी हिसकलंच व पाहिलं. बातमी खरी होती. पण त्यात बार, हुक्का पार्लर, देशी वगैरेची दुकाने बंद राहणार असेही होते. खरे तर रात्री दुकानांची गरज या वर्गातील लोकांना असते. त्यांच्यावर सरकारने अन्यायच केला म्हणावं. कोण किराणा वगैरे आणायला रात्री जाईल. 'अगं...एक प्रयोग म्हणून करीत असतील. चांगले आहे ना...सरकारचा रेव्हेन्यू वाढतो ना...तुला नाही कळायचं ते...एक कप चहा देशील बरं...' यावर सौ. म्हणाल्या 'मला न कळायला काय झालं...तुमच्यापेक्षा दोन वर्ग जास्त शिकली आहे मी...शिवाय देशाची अर्थव्यवस्था आता एक महिलाच चालवत आहे, हे विसरू नका...' आता हिच्या या वक्तव्यावरून मला चहा मिळणार नाही, हे स्पष्ट होतं. परंतु, आश्चर्य...काही वेळात चहा आलाच.




मी सुखावलो. नित्यनेमे नित्यकर्म आटोपून ऑफीसला गेलो. आज ऑफीसला कामं भरपूर होती. रात्री रस्त्याने गर्दीपण होती. आता रात्री पण दुकानं राहतात तरी लोकं रस्त्यात का गर्दी करतात, हे कळत नव्हतं. थकून भागून घरी पोहोचलो. मस्त दाबून जेवण केलं आणि मस्त ताणून दिली. थकल्यावर झोप छान लागते. नुकताच डोळा लागला असेल तर सौ. ने अगदी जोरजोरात बॉडी हलवू हलवू उठवलं. ''हं...हं...काय झालं...चोर बिर आला का घरात?...हं...' 'अहो, चोर कसा येतो मी जागी असल्यावर...मला आत्ता आठवले की उद्या सकाळसाठी चहा पावडर नाही घरात...तुम्हाला सकाळी उठून चहा लागतोच न...प्रातर्विधी येत नाही म्हणता नं तुम्ही त्याशिवाय...आणि ते झालं नाही तर दिवसभर बेचैन असता न तुम्ही...बरं झालं दुकानं सुरू असतात म्हणून... सरकारलाच काळजी बाई माझी...जरा जाता का अमृतराज दुकानात...एखाद पाव चहा आणून घ्या...' छान झोपेचं खोबरं केलं. 'अगं...एवढा दिवस गेला...सांगायचं नाही का...हे अनिलभाऊ चहावाले आता झोपले असतील...बघू सकाळी...' असे म्हणून मी पुन्हा आडवा झालो. पुन्हा हिने तोच प्रयोग केला व शेवटी मला नाईलाजाने उठावेच लागले. घड्याळात बघतो तर काय चक्क रात्रीचे साडे बारा झाले होते. हिने हातात पिशवी व शंभर रुपये दिले शिवाय मोबाईल पण दिला. 'काही समस्या आली तर फोन करा' असेही म्हणाली. घराच्या बाहेर पडलो. आमच्या घरचे सोडून सर्वांच्या घरचे दिवे बंद होते. रस्त्यावर शुकशुकाट होता. 'घर से निकलतेही, कुछ दुर चलते ही' अमृतराज चहा दुकान होतं. रस्त्यात एका मोठ्या घरातील दोन श्वान माझी चाहूल लागताच जोरजोरात भुंकायला लागले. पण, ते गेटच्या आत असल्याने मला घाबरायची गरज नव्हती. मी आपला तोंडानेच 'चु...क...चु...' असं लाडाने त्यांना समजावले आणि दुकानासमोर पोहोचलो. बघतो तर काय, दुकान बंद. अरेच्चा! यांना धंद्याची गरज नाही की सरकारचे ऐकायचे नाही, असेच वाटून गेले. त्या दुकानाच्या फलकावर अनिलभाऊंचा नंबर होता. बघा, बायका किती हुशार असतात, बरोब्बर मला जाताना मोबाईल दिला होता, तो आता कामात येणार होता. मी फोन लावला...दोन-तिनदा लावला. 'कोण आहे...नापाजी का?' तिकडून आवाज आला. नापाजी हे अनिलभाऊंचे खास मित्र. केव्हाही फोन तेच करू शकतात. 'कोण नापाजी...?' मी म्हणालो. 'अहो तुम्ही कोण बोलताय् व काय काम आहे?' 'अहो, मी वैद्य...त्या तिथे नाही राहात का...तुमचा रेग्युलर ग्राहक...' मी शक्य तितका चांगला परिचय दिला. त्यांची झोपमोड झाल्याने तशी येण्याची इच्छा नव्हती. पण मी सरकारचा नियमच वाचून दाखवला आणि मला जर चहा मिळाला नाही तर तुमच्यावर कारवाई होऊ शकते व मग तुमची कोणतीही 'चैकडी' कामात येणार नाही, अशी सरळ तंबी दिली. त्याचा असर झाला व काही वेळातच ते पोहोचले. तोपर्यंत मी अनायसे बारा वाजूनच गेले होते म्हणून मोबाईलवर नातेवाईकांना 'गूड मॉर्निंगचे' मेसेज टाकून दिले. 'घनघन' करीत त्यांनी दुकान उघडले. 'हं...कोणता चहा हवाय...हा...की हा...'' मी भाव विचारला व माझ्या शंभर रुपयात जेवढा बसेल, तेवढी चहा पत्ती त्यांच्याकडून घेतली. त्यांच्या डोळ्यात अद्याप सुस्ती होतीच. त्यांनी पटकन मला चहा दिला व दुकान बंद करून गाडीला किक मारून न बोलता निघूनही गेले. मी चहा पत्ती घेतली व परत घराकडे जायला निघालो. येताना जे श्वान बंद दारात होते, त्या मालकांनी त्यांना आता मोकळे सोडले होते. ते रस्त्यात फिरत होते. दुरुनच मी त्यांना व त्यांनी मला बघितलं. मी माझे कान टवकारले व त्यांनी त्यांचे कान टवकारले. या वेळी शेपटी मात्र त्यांनी हलवली नाही, माझा शेपटीचा प्रश्नच नव्हता, यावरून त्यांचा आता आक्रमक पवित्रा राहील, असा अंदाज मला आलाच. बराच वेळ झाल्याने हिचा फोन आला. 'अहो, किती घाबरट तुम्ही, भितेच्या दुकानात गेले म्हणून घाबरायचेच का? उचला तो दगड व भिरकावल्याची ॲक्टिंग करा...ते दुसऱ्या गल्लीत पळतात...या लवकर...मला झोप येत आहे...' मला घाबरट वगैरे म्हटल्यावर माझ्यातील माणूस जागा झाला. मी धाडस करून समोर गेलो. मी समोर येताना पाहून ते दोन श्वान अजून समोर आले. नुसते आले नाही तर आता तर धावायला लागले. नुसते धावले नाही तर भुंकायला पण लागले. आता मला माघारी पळावे लागले. धाप लागेस्तोवर मी पळत पुन्हा अमृतराज चहाच्या पायरीवर आलो.

मी दुकानाच्या पायरीवर आणि ते दोघे गल्लीच्या तोंडावर. एकदोनदा प्रयत्न केला, पण हाय रे देवा ! स्थिती जैसे थे. सौ. चा फोन येणेही बंद झाले. मी दुकानाच्या पायरीवर बसून...कधी आडवा होऊन सकाळ होण्याची वाट बघत बसलो. कुठेतरी डुलकी लागलीच होती की मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या राजाभाऊंनी काठीने टोचून उठवले. गल्ली आता मोकळी होती. रहदारी वाढली होती. मी पटापट घरी गेलो. कोणालाच खबर नव्हती. सगळे जण मस्त झोपलेले होते. सौ. तर चांगलीच घोरत होती. सकाळचा तरुण भारत पेपर दारात पडला होता. एका जाहिरातीत समोरच मुख्यमंत्र्यांचा फोटो होता. मी नमस्कार केला. सकाळी सकाळी 'देवा' ला आठवावे असे झाले. सकाळी चहाशिवाय माझे काहीच काम होत नाही, हे आधी सांगितलंच होतं. म्हणून सरळ चहा करायला स्वयंपाकघरात गेलो. काही का असेना सरकारने रात्री बाजारपेठ सुरू करण्याची परवानगी दिल्याने मला हा सकाळचा चहा प्यायला भेटणार होता, हे ही नसे थोडके. घरच्या 'सरकार'चे आभार मानायला हवे की नाही.

## खाद्य संस्कृती

# पक्वानांची राणी - पुरणपोळी



● स्नेहल खंडागळे
९९७०१३७९७७

सण म्हटले की मराठी जिव्हेला पुरणपोळी आठवलीच पाहिजे. त्याशिवाय कुठलाही कुळाचार पूर्णत्वास जात नाही. तसे तर पुरणपोळी हे यमक चांगले जुळत असेल म्हणून त्या दोघांचे कॉंबिनेशन जुळते. पण फक्त होळीशी संबंध लावणे हा पुरणपोळीवर अन्याय आहे. तशी ती गौरी, श्रावण शुक्रवार, कुळाचार, लक्ष्मीपूजन, पोळा या सणांना आवर्जून केली जाणारी अनभिषिक्त राणी आहे. आणि त्याहीपेक्षा 'खानेवालों को खाने का बहाना चाहिये'. मग ती घरी केलेली असो वा बाहेरून मागवलेली. त्यातही गंमत आहे. या पोळीची चव त्या त्या भागानुसार थोडी बदलते. पश्चिम महाराष्ट्रात ती थोडी भगराळ असते आणि दुधाशी खाल्ल्या जाते. विदर्भात मात्र आधीच्या काळी तुपाची वाटी ताटात बाजूला ठेवली जायची.

मी मात्र पुरण करायला सासरी आल्यावरच शिकले. सासूबाईंच्या प्रेमळ सूचना तंतोतंत पाळल्या. 'आपल्याकडे जरा जास्त गोड पुरण लागतं. त्यामुळे पुरेशी साखर किंवा गूळ घालायचा. आमच्याकडे अंमळ जास्तच गोड लागतं. ते रटरट शिजतं तेव्हा हाताला कपडा बांधायचा, म्हणजे पुरण ढवळताना हातावर उडून चटके बसत नाहीत.'

तेव्हा बहिणाबाई आठवतात, 'आधी हाताला चटके, तेव्हा शिजते पुरण'. ते शिजत असताना त्यात जायफळ, वेलची घातल्यावर शिजतानाचा सुगंध आसमंतात दरवळतो. त्याने पंचप्राण गोळा होऊन नाकाला सुखावतात, पण जीभेवर ठेवण्याचं सुख यायला अवकाश असतो कारण पोळ्या करून नैवेद्य दाखवेपर्यंत 'संयम संयम तो काय' हे शिकायचं असतं. पुरण हवं तसं साधणं ही कलासाधनाच आहे. कारण जास्त घट्ट वा सैल झालं तर गृहिणीची आफत सांगणे न लगे.

हे एकदा जमलं की सासूबाईंच्या सूचना 'कणिक भरपूर तेल घालून सैल मळायची. त्यात मोठा पुराणाचा गोळा भरून सर्व बाजूंनी सारखी लाटली गेली पाहिजे. पुरण असं छान पोळीच्या काठापर्यंत पोहोचलं पाहिजे.'

मग आपणही उत्साहाने पोळीवर लक्ष केंद्रित करून पोळी लाटायची. असे कष्ट घेतल्यावर पुरणाचा रंग घेऊन कणिक ही पिवळी होऊन सोनेरी दिसू लागते. हलकेच तिच्यावर थोडे तूप सोडायचे की मोहीम फत्ते.

अशी पोळी जमली की 'कथू काय मज वाटे, आनंद मनी दाटे' अशी अवस्था होते आणि मग येतो तो क्षण जेव्हा ही पोळी यथेच्छ तुपात भिजल्यावर घरच्यांच्या जीभेला सुखावते. पाहुण्यांचे, घरच्यांचे जेवून तृप्त झालेले चेहरे बघितल्यावर प्रत्यय येतो 'याजसाठी केला होता अट्टाहास'

पुरणपोळी काही एकटी येत नाही. बरोबर कटाची आमटी, भजी/वडे आणि कढीलाही हातात हात घालून घेऊन येते...आणि हो हे सगळं खाल्ल्यावर निद्राधीन होणं हा देखील अलिखित नियमच. दुसऱ्या दिवशीसाठी थोडे तरी पुरण काढून ठेवायचे. दुधात कालवून खायला पण काही जणांना आवडते. पुरणपोळीवर जितके बोलावे, लिहावे तितके कमीच आहे.

ज्यांनी कोणी पुरणपोळीचा शोध लावला त्यांचे या जन्मी ऋण फेडणे अशक्य. हो ना?

● संयोजक ● संजय रामगिरवार, ९८८१७१७८३२

## अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयासोबत सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर - नेस्ले इंडियाने भारताप्रती आपली कटिबद्धता अधिक दृढ केली, जेथे ओडिशामधील व त्यांच्या विद्यमान उत्पादन ठिकाणी ग्रीन फिल्ड व ब्राऊन फिल्ड प्रकल्पांमध्ये गुंतवणूका वाढवण्यासाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयासोबत (एमओएफपीआय) सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली. नवी दिल्लीमध्ये वर्ल्ड फूड इंडिया समिट २०२५ येथे या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. नेस्ले इंडियाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. मनिष तिवारी म्हणाले, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयासोबत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यामधून पुढील २ ते ३ वर्षांच्या कालावधीत ओडिशा आणि विद्यमान उत्पादन ठिकाणी ग्रीन फिल्ड व ब्राऊन फिल्ड प्रकल्पांमधील अन्न प्रक्रिया क्षेत्रात गुंतवणूका करण्याप्रती नेस्ले इंडियाची कटिबद्धता दिसून येते. यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजागार संधी निर्माण होण्याची देखील अपेक्षा आहे, ज्यामुळे भारताच्या विकासगाथेप्रती आमची कटिबद्धता अधिक दृढ होईल, तसेच आम्ही आत्मनिर्भर भारतच्या दिशेने हा प्रवास सुरू ठेवला आहे.''

## जागतिक हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताची स्थिती मजबूत

मुंबई: लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला त्यांच्या सर्जिकल कंज्यूमेबल्स, ऑर्थोपेडिक सपोर्ट्स आणि हायजीन उत्पादनांच्या मालिकेसाठी यूएस एफडीए नोंदणी मिळाली आहे - ही उपलब्धी कंपनीच्या उत्कृष्ट उत्पादन क्षमतेचे प्रतीक आहे आणि जागतिक हेल्थकेअर सप्लाय चेनमध्ये भारताची स्थिती अधिक मजबूत करते.यूएस एफडीए नोंदणी उत्पादन सुरक्षा, गुणवत्ता आणि अनुपालनाचे सर्वोच्च मानक दर्शवते. भारतीय उत्पादकांसाठी हे अमेरिके, युरोपियन युनियन आणि मध्य पूर्व यांसारख्या नियमनयुक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचे दारे उघडते, ज्यामुळे व्यवसाय वृद्धीच्या अपूर्व संधी निर्माण होतात. लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजसाठी ही त्यांच्या जागतिक विस्ताराच्या प्रवासातील ऐतिहासिक क्षण आहे, जे निर्यात संधी वाढवते आणि हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताला जागतिक नेतृत्वाकडे घेऊन जाते.

## एक्स्ट्रामार्क्स शाळांमध्ये एक्स्ट्रा इंटेलिजेंसचा वापर!

पुणे -- भारतातील अग्रगण्य एज्युकेशन कंपन्यांपैकी एक असलेल्या एक्स्ट्रामार्क्स एज्युकेशनने आज पुण्यात एक्स्ट्रा इंटेलिजेंस सादर करण्याची घोषणा केली, शिक्षकांना सक्षम करण्यासाठी, विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी आणि वर्गखोल्यांचे बुद्धिमान, सहयोगी शिक्षण वातावरणात रूपांतर करण्यासाठी डिझाइन केलेले एक अभूतपूर्व नवोपक्रम आहे.एक्स्ट्रा इंटेलिजेंससह, एक्स्ट्रामार्क्स ही पहिली शिक्षण कंपनी आहे, जी संपूर्ण शालेय परिसंस्थेत एआयला अर्थपूर्णपणे एकत्रित करते. यात धडा नियोजन आणि वर्गातील अध्यापनापासून ते मूल्यांकन आणि शाळेनंतरच्या शिक्षणापर्यंतचा समावेश आहे. या प्रसंगी, एक्स्ट्रामार्क्स एज्युकेशनचे मुख्य शैक्षणिक अधिकारी श्री. वेंकट फणिकिरन यांनी मुख्य भाषण दिले. पुण्यातील शिक्षकांनी दोन उच्च-स्तरीय पॅनेल चर्चेत भाग घेतला, ज्यामध्ये एआय शिक्षण अधिक वैयक्तिकृत, परस्परसंवादी आणि सुलभ कसे बनवू शकते यावर चर्चा झाली. द नॉलेज हॅबिटॅट स्कूलच्या प्राचार्या डॉ. अमृता प्रभू, अश्विनी इंटरनॅशनल स्कूलच्या संस्थापक प्राचार्या आणि संचालक सुश्री इला राठोड, युनायटेड इंटरनॅशनल स्कूलच्या संचालिका डॉ. काजल छतिजा, न्यू पुणे पब्लिक स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कनिका आनंद आणि एक्स्ट्रामार्क्स एज्युकेशनच्या बिझनेस युनिट हेड श्री. संदीप कुमार यांनी एम्पॉवरिंग टीचर्स विथ एआय: पार्टनरशिप्स फॉर इनोव्हेटिव्ह टीचिंग अँड लर्निंग या विषयावर चर्चा केली.

## फुजीफिल्म जीएफएक्स एटर्ना ए ५५ लॉंच

मुंबई - इमेजिंग तंत्रज्ञानातील आघाडीच्या कंपनी फुजीफिल्म इंडियाने भारतात फुजीफिल्म जीएफएक्स एटर्ना ५५ चे अनावरण केले. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणाऱ्या ब्रॉडकास्ट इंडिया शो २०२५ मध्ये हा फिल्ममेकिंग कॅमेरा लॉंच करण्यात आला. जीएफएक्स एटर्ना ५५ मध्ये एक मोठा फॉरमॅट सेन्सर; आहे ज्याची कर्णरिषा अंदाजे ५५ मिमी आहे, जीएफएक्स १०२एमपी सीएमओएस खख एचएस, जो फुल-फ्रेम ३५ मिमी सेन्सरपेक्षा अंदाजे १.७ पट मोठा आहे आणि हाय-स्पीड इमेज प्रोसेसिंग इंजिन एक्स-प्रोसेसर ५ आहे, ज्यामुळे चित्रपट निर्मात्यांना समृद्ध, वास्तविक दृश्ये कॅप्चर करता येतात आणि पोस्ट-प्रॉडक्शनमध्ये वाढीव लवचिकता मिळते. जीएफएक्स एटर्ना ५५ उच्च प्रतिमा गुणवत्तेसह समृद्ध टोनल अभिव्यक्ती प्रदान करते आणि कंपनीच्या स्थापनेपासून ९० वर्षांहून अधिक काळ विकसित केलेल्या आमच्या रंग पुनरुत्पादन तंत्रज्ञानाद्वारे अधिक वैविध्यपूर्ण दृश्य अभिव्यक्ती सक्षम करते.

## 'आयडिया चॅम्पियनशिप' मध्ये ७३% गुणांसह प्रथम

छत्रपती संभाजीनगर: भारतातील आघाडीच्या जनसंपर्क कंपनी, पीआर २४७ चा एक अनोखा उपक्रम 'आयडिया चॅम्पियनशिप' मोठ्या यशाने संपन्न झाला. या स्पर्धेचा उद्देश कर्मचाऱ्यांची सर्जनशीलता आणि त्यांच्या नवीन कल्पना बाहेर आणणे हा आहे, त्यामुळे कंपनीच्या विकासाला एक नवीन दिशा मिळू शकते. कंपनीने किंवा उत्तराख्याच्या माध्यमातून हा संदेश दिला आहे की त्याची खरी ताकद लोक आहेत आणि त्यांचे विचार कंपनीच्या प्रगतीचा आधार आहेत.किंवा कंपनीच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. सर्व प्रतिभावान लोकांनी सहा संघांमध्ये भाग घेतला, प्रत्येक संघात सहा सदस्य होते. प्रत्येक संघाला व्यवसाय वाढीवर लक्ष केंद्रित करणारी सर्वोत्तम आणि व्यावहारिक कल्पना सादर करण्याचे आव्हान देण्यात आले. डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया स्ट्रॅटेजी, ब्रँड व्हॅल्यू, कलर कनेक्ट आणि अंतर्गत प्रक्रिया सुधारण्यासाठी संघांनी स्वतःच्या कल्पना सादर केल्या.

## पॅन-इंडिया विस्तार योजना, दर्जेदार सेवा सुरुच

पुणे : भारतातील आघाडीची पीआर एजन्सी असलेल्या पीआर २४७ ने आज त्यांच्या गोल्डन स्तंभ, १० वर्षांहून अधिक काळ संस्थेसोबत असलेल्या समर्पित कर्मचाऱ्यांना विशेष मान्यता देऊन एक ऐतिहासिक क्षण साजरा केला. या समारंभात पीआर २४ ७ २.० नावाच्या एका नवीन युगाची सुरुवात झाली. या प्रसंगी, कंपनीने संपूर्ण भारतात त्यांच्या सेवांचा विस्तार करण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय जाहीर केले, जे त्यांच्या प्रादेशिक मीडिया नेटवर्कची ताकद राष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे. गोल्डन स्तंभ उज्जैन सिंग चौहान, विकास राजोरा, परिणीता नगरकर खेले, संस्कृती मिश्रा, नेहा गौर, दीपक चड्डा, मीना बिसेन आणि विनीत भट्ट यांना त्यांच्या दशकांच्या योगदानासाठी केवळ सन्मानित करण्यात आले नाही तर नवीन जबाबदाऱ्या देखील सोपवण्यात आल्या. या प्रसंगी, संस्थापक डॉ. अतुल मलिकराम म्हणाले, हे गोल्डन पिलर्स कंपनीचे आधारस्तंभ आहेत, ज्यांच्या समर्पणाने आणि कौशल्याने पीआर २४७ ही भारतातील सर्वात विश्वासार्ह प्रादेशिक पीआर एजन्सी म्हणून स्थापित केली आहे. ते पुढे म्हणाले, हे गोल्डन पिलर्स केवळ कर्मचारी नाहीत तर गेल्या दशकात प्रत्येक चढ-उतारात आमच्या पाठीशी उभे राहिलेले कुटुंबातील सदस्य आहेत. त्यांचे समर्पण आम्हाला पीआर २४७ २.० कडे घेऊन जात आहे, जिथे आम्ही डिजिटल आणि प्रभावशाली मार्केटिंग मजबूत करून संपूर्ण भारतात विस्तार करू.

## मोटोरोलाने फ्लिपकार्ट बिग बँग दिवाळी सेलदरम्यान

मुंबई : मोटोरोला ही मोबाइल तंत्रज्ञानामधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज फ्लिपकार्टच्या बिग बँग दिवाळी सेल २०२५ साठी अभूतपूर्व किमतींमध्ये त्यांच्या सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन्सवर सर्वात मोठ्या हंगामी सूटची घोषणा केली. बिगबैंगदिवालीसेल चा भाग म्हणून मोटोरोला एआय, पॅन्टोन' डिझाइनमधील नवीन सुधारणा आणि टिकाऊपणा लाखो ग्राहकांसाठी अनपेक्षित किमतीमध्ये सादर करत आहे. हे डिवाईसेस सेलमध्ये उपलब्ध आहेत आणि बिग बँग दिवाळी सेलदरम्यान सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध असतील. सीझनच्या सर्वात मोठ्या ऑफरची सुरूवात करत मूळ किंमत २९,९९९ असलेला मोटोरोला एज ६० प्रो(८+२५६ जीबी मॉडेल) आता फक्त २४,९९९ च्या उत्सवी प्रभावी किमतीमध्ये खरेदी करता येऊ शकतो, ज्यामुळे हा स्मार्टफोन २५के अंतर्गत सर्वात धुमाकूळ निर्माण करणारा प्रमुख ठरला आहे.

# एमजीएममध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय पालि परिषदेचे उद्घाटन संपन्न




छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज आणि भारतीय व विदेशी भाषा संस्थेच्या वतीने 'पालि : जन-जन की बोली' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आज रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला. मान्यवरांनी ब्राम्ही लिपीत आपल्या नावाची पालि भाषेत स्वाक्षरी करून एका आगळ्या वेगळ्या पद्धतीने या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन केले.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पाली आणि प्राकृत भाषेचे प्रा.डॉ.भागचंद्र जैन, धम्मा लिपी अभ्यासक अतुल भोसेकर, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, डॉ.भिखू आनंद, डॉ.संजय मोहड, प्रा.यश कश्यपायन, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, संचालक डॉ. के.पी.सिंग, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

गौतम बुद्धांनी पालि भाषेच्या माध्यमातून आपले तत्वज्ञान सांगितले. पालि भाषा त्याकाळी सर्व सामान्य लोकांची होती. या भाषेवर संशोधन व्हावे तसेच नवीन पिढीला पालि भाषेचे महत्व कळावे, या उद्देशाने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांनी व्यक्त केलेले विचार खालीलप्रमाणे आहेत :

अंकुशराव कदम, कुलपती, एमजीएम विद्यापीठ : पालि भाषेचे शिक्षण सर्वांनी घेणे आवश्यक असून या भाषेत सर्व प्रकारचे ज्ञान उपलब्ध आहे. पालि भाषेच्या संशोधनासाठी एमजीएम विद्यापीठ प्रयत्न करत असून या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून त्यास अधिक गतीने चालना मिळेल. या परिषदेत विविध भागातून आलेल्या सर्व संशोधक, अभ्यासक आणि मान्यवरांचे मी एमजीएममध्ये मनापासून स्वागत करतो. पालि भाषेसाठी जे प्रयत्न होत आहेत, त्या माध्यमातून मराठवाड्यात एक चांगले केंद्र उभे राहील, अशी आशा यानिमित्ताने व्यक्त करतो.

डॉ.विलास सपकाळ, कुलगुरू, एमजीएम विद्यापीठ : एमजीएम विद्यापीठात मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच, उर्दू, जर्मनी आणि पाली भाषेचे शिक्षण दिले जाते. या आज आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून नवीन संशोधनाला चालना मिळणार आहे.

# पूरग्रस्तांसाठी आयएमए छत्रपती संभाजीनगरचा मदतीचा हात

### मुख्यमंत्री सहायता निधीस २ लाख रुपयांची देणगी सुपूर्द

छत्रपती संभाजीनगर, : अलीकडील अतिवृष्टीमुळे मराठवाडा भाग गंभीर पूरस्थितीत सापडला . या संकटात इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेने तात्काळ प्रतिसाद देत पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला.पूरानंतर संसर्गजन्य आणि त्वचारोग वाढण्याचा धोका लक्षात घेऊन आयएमएच्या डॉक्टरांच्या पथकाने पूरग्रस्त भागात मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर आयोजित केले.

या शिबिरात अनेक रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि त्यांना आवश्यक औषधे व आरोग्य मार्गदर्शन देण्यात आले. आरोग्य शिबिरानंतर पूरग्रस्त कुटुंबांना तात्काळ अन्नधान्य मिळावे म्हणून ११० धान्य किट्स वाटप करण्यात आल्या. प्रत्येक किटमध्ये गव्हाचे पीठ, तांदूळ, तूर डाळ, साखर आणि बिस्किटांचे पुडे होते. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळाला. पूरग्रस्तांच्या पुनर्वसन कार्यात हातभार





लावण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेने आज २ लाख रुपयांची देणगी मुख्यमंत्री सहायता निधीस सुपूर्द केली. ही देणगी आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेच्या डॉक्टर सदस्यांच्या योगदानातून जमा करण्यात आली आहे. आज या देणगीचा धनादेश जिल्हाधिकारी मा. दिलीप स्वामी साहेब यांच्याकडे अधिकृतरीत्या सुपूर्द करण्यात आला.

या प्रसंगी अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, बिल्डिंग प्लॉट कमिटी चेअरमन डॉ यशवंत गाडे, माजी अध्यक्ष डॉ दत्ता कदम, सचिव डॉ. योगेश लक्कस उपस्थित होते. जिल्हाधिकारी मा. स्वामी यांनी आयएमएच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत डॉक्टर समाजाच्या संवेदनशीलतेचे आणि उत्तरदायित्वाचे अभिनंदन केले.

याप्रसंगी बोलताना डॉ अनुपम टाकळकरांनी प्रसारमाध्यमांसमोर आपली भूमिका स्पष्ट केली पूरग्रस्त भागातील लोकांचे दुःख आम्ही प्रत्यक्ष पाहिले. वैद्यकीय मदत आणि अन्नधान्य वाटपानंतर आम्हाला वाटले की दीर्घकालीन पुनर्वसनासाठी शासनाला सहाय्य करणे ही खरी जबाबदारी आहे. त्यामुळे आमच्या काही डॉक्टर सदस्यांनी एकत्र येऊन मुख्यमंत्री सहायता निधीस २ लाख रुपयांची देणगी दिली आहे. डॉक्टर समाजाचा एक भाग म्हणून आम्ही केवळ उपचार देणारे नसून समाजाचे आरोग्यरक्षक आहोत. संकटात उभे राहणे, माणुसकीचे भान ठेवणे आणि गरजूंना मदतीचा हात देणे हे आमचे ध्येय आहे.आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखा ही केवळ आरोग्य सेवेतच नव्हे, तर सामाजिक उत्तरदायित्वातही सदैव अग्रस्थानी राहिली आहे. कोविड काळातील निःस्वार्थ सेवा, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती मोहीमा या परंपरेत हा पूरग्रस्त मदत उपक्रम आणखी एक अर्थपूर्ण पाऊल ठरले आहे.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात हृदय-पल्मोनरी पुनरुत्थान (सीपीआर) जागरूकता सप्ताह साजरा

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१४ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.१३ ते १७ ऑक्टोबर २०२५ दरम्यान देशभरात साजरा करण्यात येणारा हृदय-पल्मोनरी पुनरुत्थान (सीपीआर) जागरूकता सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार तर प्रमुख उपस्थित म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.आर.के.बारोटे आदी मान्यवर उपस्थित होते.



याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयांमध्ये सीपीआर कसा द्यावा याबद्दल विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आली.तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना अचानक उद्भवलेल्या आपत्तीचे व्यवस्थापन कसे करावे याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.त्यावेळी त्यांनी आपत्ती व्यवस्थापनामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवा असे प्रतिपादन केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील,डॉ.रमेश अवताडे,प्रा. किशोर नाले,डॉ. शत्रुघ्नं भोरे,डॉ.निलेश गाडेकर,डॉ.सैराज तडवी,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.पंकज गावीत,डॉ.सुनील चौधरे महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी केले तर डॉ. सुनील चौधरे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,कार्यक्रमाधिकारी डॉ. निलेश गावडे,डॉ.पंकज गावित,डॉ. सुनील चौधरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २७२/२०२५

१/- धनराज रंगलाल राठोड, वय ४७ वर्ष, धंदा शेती, रा. वरखेडी (वृ), ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- पिंटू रंगलाल राठोड, वय ३८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- गणेश रंगलाल राठोड, वय ३० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अड. सचिन सुनील गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रंगलाल तोताराम राठोड यांचा दिनांक ०७.०२.२०२४ रोजी मौजे लिहे दिगर येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत रंगलाल तोताराम राठोड यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १४/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २४/११/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

दिनांक :- १४/१०/२०२५

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे सावखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत जमिन गट नं.२२९, एकुण क्षेत्रफळ ३ हे. ३० आर. शेत जमिनीपैकी १) शकुर मुराद शेख, २) इब्राहीम मुरादभाई शेख दोघे रा. सावखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, ३) लातिफावी अमीर शेख रा. बाळानगर, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, ४) जुलेखावी गणी शेख, रा. सावखेडा ता. गंगापुर व ५) शे. शब्बीर शं. हबीव रा. सावखेडा ता. गंगापुर यांचे सामाईक मालकी व ताब्यातील ०.४० आर. शेत जमिन ही कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचा करार मिळकत मालक यांच्यासोबत केलेला आहे. सदर मिळकत ही निर्वीवाद, निंजोखीम असल्याबाबत तसेच सदर जमिनीबाबत कोणताही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नसल्याची ग्वाही मिळकत मालकांनी माझ्या पक्षकारांना दिलेली आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध उदा. गहान, दान, तारण, बक्षिस, हिस्सा, चोळी बांगडी, कुळ, लिज, अथवा इतर पध्दतीचे हक्क असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप १५ दिवसात माझ्या नमुद पत्यावर लेखी स्वरुपात कागदपत्रांसह सादर करावा, मुदतीनंतर माझे पक्षकार वरील नमुद मिळकतीचा खरेदीखताचा पुढील व्यवहार पूर्ण करतील, कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करीत आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे सावखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत जमिन गट नं.२२९, एकुण क्षेत्रफळ ३ हे. ३० आर. शेत जमिनीपैकी १) शकुर मुराद शेख, २) इब्राहीम मुरादभाई शेख दोघे रा. सावखेडा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, ३) लातिफनवी अमीर शेख रा. बाळानगर, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, ४) जुलेखाबी गणी शेख, रा. सावखेडा ता. गंगापुर व ५) शे. शब्बीर शे. हवीब रा. सावखेडा ता. गंगापुर यांचे सामाईक मालकी व ताब्यातील ०.४० आर. शेत जमिन जिच्या चतुःसिमा,

पुर्वस : जायकवाडी संपादीत क्षेत्र — पश्चिमेस : शोभा रमेश निकम यांची जमिन

दक्षिणेस : जायकवाडी संपादीत क्षेत्र — उत्तरेस : महेश हरीभाऊ बोरुडे व हरीभाऊ लहु बोरुडे यांची जमिन,

करीता हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार मार्फत
ॲड. शि. के तारू
१६ महसुल हाऊसिंग सोसायटी, गंगापूर मो.९४२२२५९९८३,९८८१२८७७८८

जावक क्रमांक ५४७३/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद
दि. ०९/१०/२०२५

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन. क्रमांक: ARN/00121/18/25

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांकः, चौ.क्र. 46/2025

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री संत गाड्गे बाबा महाराज धोबी समाज संस्थान वेरुळ, ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर बाबत ।

न्यासाचा पत्ता: वेरुळ, खुलताबाद,.. छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, वेरुळ

अर्जदार : बबन बन्सी तांदळे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेतः-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Nill | 00.00 |

(अ) जंगम मिळकतः रोख रु. ००/- मात्र
(अक्षरी रुपये ०/- मात्र फक्त)

स्थावर मिळकत (वर्ण)

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्याकन किंवा स्वरूप | मुदत/कालावधी | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | VERUL TO KHULTABAD CHHATRAPATI DIST SAMBHAJINAG AR | GUT NO 7 | गट नं. ७ मधील १ हे ४७ आर पैकी २० आर शेतजमीन | ० | ० | ५०००००.०० |
| 2. | East direction velganga river | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3. | west direction-0 whose written sell deed. his pri | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4. | north direction Ganesh temple and martand dolas | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | south direction-The remaining land of the underwr | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

(ब) स्थावर मिळकत रोख रु. ५०००००/- मात्र - (अक्षरी रुपये पाच लाख मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०९-१०-२०२५ रोजी दिली.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

# अवैध रित्या शेतात गांजा उगवण विक्री करणारा मुद्देमालासह ताब्यात




तभा वृत्तसेवा

फर्दापूर . फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पळसखेडा शिवारात आरोपी ने अवैध रित्या शेतात गांजा लावून विक्री करण्यासाठी लावला होता आरोपी आयसखा शेकलाल तडवी वय ६९ रा गोद्री ता जामनेर जिल्हा जळगाव यांनी शेत मालक नामदेव रुपचंद तायडे गट नंबर १७ पळसखेडा शिवारात यांच्या शेतात अवैध रित्या गांजाची झाडे यांची लागवड करण्यात आली होती यावेळी हि वार्ता गुपीत माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून या शेतात धाड टाकली असता आरोपी मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आला यावेळी हा गांजा वीस किलो असुन त्यांची किंमत एक लाख रुपये किंमतीची हा गांजा आरोपी सह ताब्यात घेण्यात आला असून यावेळी फर्दापूर पोलिस स्टेशन चे सहा पोलिस स्टेशन प्रफुल्ल साबळे पोलिस कर्मचारी मिरखा तडवी यांनी हि कारावाई करण्यात आली.

# शॉपर्स स्टॉपचा 'गिफ्ट ऑफ लव्ह' दिवाळी कॅम्पेन

छत्रपती संभाजीनगर, १४ ऑक्टोबर : भारतातील आघाडीचे फॅशन आणि ब्युटी डेस्टिनेशन शॉपर्स स्टॉप यांनी दिवाळी निमित्त 'गिफ्ट ऑफ लव्ह' ही नवी फिल्म सादर केली असून, यात लोकप्रिय ओटीटी अभिनेत्री तान्या मानिकताला झळकली आहे.




या कॅम्पेनद्वारे विचारपूर्वक निवडलेल्या भेटवस्तूंद्वारे प्रेम व्यक्त करण्याचा आनंद साजरा करण्यात आला आहे. तान्या शॉपर्स स्टॉपच्या स्टोअरमध्ये विविध गिफ्ट्स निवडताना दिसते, ज्यातून प्रत्येक वस्तू तिच्या जवळच्या व्यक्तींसाठी प्रेमाचे प्रतीक ठरते.

शॉपर्स स्टॉपचे प्रमुख मार्केटिंग अधिकारी जितेन महेंद्र म्हणाले, भेट ही केवळ वस्तू नसून तिच्यामागील भावना महत्त्वाची असते.

५०० हून अधिक प्रीमियम ब्रँड्ससह कपडे, ब्युटी, फ्रेगरन्सेस, हँडबॅग्ज व होम डेकोरमध्ये विविध पर्याय देत शॉपर्स स्टॉप या सणासुदीच्या काळात खरेदीचा अनोखा अनुभव देत आहे.

ग्राहकांना स्टोअरमध्ये किंवा ऑनलाइन www.shoppersstop.com (http://www.shoppersstop.com) वर खरेदीचा आनंद घेण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे.

**AHILYANAGAR MUNICIPAL CORPORATION**

**E-Tender Notice No. 2025_ANMC_1225500_1**
**For 2025-2026**

Ahilyanagar Municipal Corporation invites E-tender for Appointment of a private agency for the provision of technical and non- technical Staff and Engineers for the distribution system including for the City Water Supply Scheme of Ahilyanagar Municipal Corporation Tal. & Dist. Ahilyanagar in the state of Maharashtra, Please visit following website **www.mahatenders.gov.in** for detailed information.

**sd/-**
**Dy.Commissioner**
**Ahilyanagar Municipal Corporation**
**Ahilyanagar**

## टी.सी. हरवली...

**माझी नेहा सुधीर गायकवाड या नावाची अकरावी पास ची टी.सी.पूर्णा बसस्थानक परिसरात हरवली आहे.कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.**

**पत्ता - डॉ. आंबेडकर नगर, पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी.**

**संपर्क : मो. ९७६६७७८१३६**

**उपविभागीय अधिकारी, (महसुल) वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात**

संचिका क्र.२०२५/३.वि.अ.वै. एम.ए.जी./ज.मू. नौद/ — दिनांक १३/१०/२०२५

## जाहिर प्रगटन

अर्जदार - श्रीमती ताई धोंडीराम सुसलादे रा. डोमेगाव ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय रा. डोमेगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नौदी बाबत

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी त्यांचे स्वत नामे श्रीमती ताई ढेडीराम सुसलादे यांनी त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे यांचे स्वत नामे श्रीमती लाई धोंडीराम सुसलादे यांची जन्म नोंद दिनांक ०१/१०/१९८९ रोजी डोमेगाव ता. गंगापूर येथे झालेला आहे.

अर्जदार यांचे स्वत जन्म नोंद दिनांक ०१/१०/१९८९ रोजी डोमेगाव ता. गंगापूर असा असून कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यानी मा. न्यालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार मागणी केल्यानुसार जन्म नौद दिनांक ०१/१०/१९८९ रोजी डोमेगाव ता. गंगापूर येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २८/१०/२०२५ रोजी मा. न्यायालतया लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदार याचा जन्म नोंद दिनांक ०१/१०/१९८९ रोजी डोनेगाव ता. गंगापूर रोये जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला आक्षेप/उजर ग्राहय धरला जाणार नाही.

करीता दिनांक १३/१०/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे

उपविभागीय अधिकारी वैजापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७०३/२०२५

लक्ष्मीबाई रामभाऊ बागुल व इतर
विरूध्द
निरंक

प्रकरण- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत रामभाऊ आनंदा बागुल हे दि.०५/१२/२०२३ रोजी मौजे दायगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. लक्ष्मीबाई रामभाऊ बागुल, २. अलकाबाई कचरु दुशिंग, रा. नेवरगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३. उषा लक्ष्मण चाबुकस्वार, रा. बाभळेश्वर, ता. राहाता, जि. अहमदनगर ४. लताबाई अशोक जाधव, रा. बोलठाण, ता. नांदगाव, जि.नाशिक ५. उषाबाई राउसाहेब दुशिंग, रा. रांजणगाव नरहरी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६. कचरु रामभाऊ बागुल, ७. आण्णा रामभाऊ बागुल, अर्जदार नं. १, ६ व ७ रा. दायगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी सर्वांनी मिळुन मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ७ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि. १३/१०/२०२५

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## अग्रलेख...

# सहन होत नाही, आणि...

काँग्रेसची सत्ता असताना केंद्र सरकारात दीर्घकाळ अर्थमंत्री राहिलेले व देशांतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने काहीशा अस्थिर झालेल्या काळात केंद्रीय गृहमंत्रिपदी राहिलेले काँग्रेसचे नेते पी. चिदम्बरम् यांनी काही दिवसांच्या अंतराने पुन्हा एकदा पक्षनेतृत्वाच्या कमकुवत धोरणांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष टीका केली. कळत नकळत केलेल्या वक्तव्याचे काही विपरीत राजकीय परिणाम होतात असे दिसले, तर परिपक्व नेता सारवासारव करतो, कधीकधी दिलगिरीही व्यक्त करतो आणि क्वचित त्यासाठीचे प्रायश्चित्तदेखील घेतो. त्यानंतर पुन्हा तशी चूक करण्याचे तो कटाक्षाने टाळतो आणि एकदा केलेली चूक कायमची लक्षातही ठेवतो. चिदम्बरम् यांनी काही दिवसांपूर्वीच एका वृत्तवाहिनीस दिलेल्या मुलाखतीत, २६/११ च्या भारतावरील दहशतवादी हल्ल्यानंतर काँग्रेस सरकारने घेतलेल्या कचखाऊ भूमिकेचा गौप्यस्फोट केला होता. मुंबईवरील त्या दहशतवादी हल्ल्यात शेकडो निरपराध लोकांची पाकिस्तानातून प्रशिक्षण घेऊन आलेल्या मूठभर अतिरेकी दहशतवाद्यांनी भीषण हत्या केली होती आणि देशाच्या सुरक्षा व्यवस्थेतील अक्षम्य त्रुटी व त्याकडे कानाडोळा करण्याचे बेजबाबदार प्रकारही उघड झाले होते. त्या वेळी मनमोहन सिंग सरकारने पाकिस्तानवर हल्ला करून देशातील त्या सर्वांत भीषण दहशतवादी हल्ल्याचा बदला घ्यावा अशी सर्वसामान्य जनतेची आणि केंद्र सरकारातील काही मंत्र्यांची व काही राजकीय नेत्यांचीही इच्छा होती. पण त्या वेळी मनमोहन सिंग सरकारने माघार घेतली व पाकिस्तानवर हल्ला न करण्याचा निर्णय घेतला, असे त्या मुलाखतीत चिदम्बरम् यांनी म्हटले होते. त्याच काळात भारत आणि पाकिस्तान दरम्यान तीव्र तणाव निर्माण झालेला असताना अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्रीय सल्लागार मेंडोलिसा राईस यांनी तातडीने भारतात येऊन पाकिस्तानवर हल्ला न करण्याचा सल्ला मनमोहन सिंग सरकारला दिला होता, असेही त्या मुलाखतीत चिदम्बरम् म्हणाले होते. काँग्रेसच्या सर्वेसर्वा असलेल्या सोनिया गांधी यांनीही तोच सल्ला दिल्याने, जनतेची इच्छा व लष्कराची तयारी असूनही भारताने पाकिस्तानचा बदला न घेण्याचा मार्ग मान्य केला, अशा आशयाच्या त्या मुलाखतीनंतर उठलेल्या राजकीय वादळानंतर चिदम्बरम् यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांची ती विधाने काँग्रेस सरकारच्या व नेतृत्वाच्या चुका दाखवून गेलीच व नेतृत्वाच्या क्षमतेवरही बोट ठेवून गेली होती. त्याचे राजकीय परिणाम जे व्हायचे, ते त्यानंतर काँग्रेसला अनुभवावे लागले. तोवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करत, अमेरिकेसमोर शरणागती पत्करल्याचा आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांचा सूरही त्यामुळे मवाळ तर झालाच, पण काँग्रेस हाच शरणागत मानसिकतेचा पक्ष असल्याची बाबही अधोरेखित झाल्याने काँग्रेसी आक्रमक टीकेची धारदेखील बोथट झाली. त्या वेळी चिदम्बरम् यांनी हा मुद्दा बोलण्याच्या ओघात पुढे आणला असेल किंवा त्याचे पक्षावरील राजकीय परिणाम काय असतील याची त्यांना जाणीव नसेल असे मानणे भोळसटपणाचेच ठरेल. कारण आज काँग्रेसच्या नेतृत्वाच्या फळीत जे कोणी मोजके नेते समंजस व परिपक्व मानले जातात त्यामध्ये चिदम्बरम् यांचे स्थान वरचे आहे. तरीही, पक्षाच्या केंद्रीय स्तरावरील कार्यशैलीपासून त्यांना काहीसे दूर राखले जात असल्याचेही त्या मुलाखतीतील त्यांच्या काही सूचक संकेतांवरून स्पष्ट झाले होते. कदाचित ती त्यांची खंतदेखील असावी. त्या नाराजीतूनच त्यांनी काँग्रेसच्या त्या वेळच्या शरणागत मानसिकतेबद्दल उघड नाराजी व्यक्त केली असावी आणि त्याचे अपेक्षित राजकीय पडसाद उमटू लागताच त्यावर सारवासारव करण्याचा प्रयत्न केला असावा.

चिदम्बरम् यांच्या त्या वक्तव्याचे पडसाद अजूनही देशाच्या राजकारणात उमटत असताना व त्यामुळे काँग्रेसची अवस्था काहीशी अवघड झालेली असताना पुन्हा एक ताजे वक्तव्य करून काँग्रेसवर नवा हल्ला चढविण्याचे नवे, धारदार शस्त्र त्यांनी भाजपच्या हाती सोपविले आहे. खलिस्तानी चळवळीचा बीमोड करण्यासाठी जून १९८४ मध्ये अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लष्कर घुसवून तेथे आश्रय घेतलेल्या खलिस्तानवादी अतिरेक्यांना पकडण्यासाठी केलेली ऑपरेशन ब्लू स्टार ही कारवाई म्हणजे मोठी चूक होती व या चुकीपायी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जिवाची किंमत मोजावी लागली अशी स्पष्टोक्ती करून पुन्हा एकदा चिदम्बरम् यांनी काँग्रेसला अडचणीत आणले आहे. ती कारवाई म्हणजे लष्कर, गुप्तचर विभाग आणि नागरी संरक्षण यंत्रणा यांचा संयुक्त निर्णय होता, त्यामुळे या चुकीचे खापर केवळ इंदिरा गांधी यांच्यावर फोडणे योग्य होणार नाही, हा खुलासाही त्यांनी या वक्तव्यानंतर लगेचच करून टाकला असला, तरी अशा निर्णयाचे अंतिम अधिकार देशाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांवर असते, ही बाब त्यांनी अगोदरच्या मुलाखतीतूनच अधोरेखित करून ठेवलेली होती. २६/११ च्या अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानवर लष्करी कारवाई न करण्याचा अंतिम निर्णय पंतप्रधान या नात्याने डॉ. मनमोहन सिंग यांनी घेतला होता, असे सूचित करून राजकीयदृष्ट्या काँग्रेसची कोंडी करणाऱ्या चिदम्बरम् यांनी ऑपरेशन ब्लू स्टारवरील कारवाईबाबत मात्र त्यावेळी पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांना त्या चुकीच्या ठपक्यातून बाजूला ठेवण्याचा चाणाक्षपणा दाखविला आहे. हिमाचल प्रदेशातील कसौली येथे खुशवंत सिंग साहित्य उत्सवातील एका मुलाखतीत त्यांनी हे वक्तव्य केले आणि अपेक्षेप्रमाणे भाजपने काँग्रेसच्या नेतृत्वक्षमतेवर उमटलेले पक्षांतर्गत प्रश्नचिन्ह ठळक करण्याची नेमकी संधी साधली. आता या वक्तव्याबद्दल त्यांच्यावर काय कारवाई करावी यावर पक्षश्रेष्ठींचा खल सुरू झाला असेल, पण तशी काही कारवाई केलीच, तर पक्षातील काही जाणत्या नेत्यांची अगोदरच कमकुवत असलेली कुमक अधिकच दुबळी होईल याचीही पक्षश्रेष्ठींना जाणीव असेल. त्यामुळे, चिदम्बरम् यांची वक्तव्ये व त्याचे राजकीय पडसाद म्हणजे काँग्रेससाठी सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशीच काहीशी अवघडलेली स्थिती होऊन राहणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे एकमेव सर्वेसर्वा नेते राहुल गांधी यांच्या क्षमतांबाबत पक्षात अगोदरच नाराजीच्या अनेक ज्वालामुखींचा उद्रेक झालेला आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी, ऑगस्ट २०२० मध्ये कपिल सिब्बल यांच्यासह २३ ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी थेट सोनिया गांधी यांना पत्र लिहून नेतृत्वाच्या क्षमतेविषयी शंका व्यक्त करून पक्षात पुकारलेल्या बंडाचा मोठा फटका काँग्रेसला व विशेषत: गांधी परिवाराच्या एकमुखी नेतृत्वाला बसला होता. उत्तर प्रदेश, पंजाब, गोवा, उत्तराखंड, मणिपूर या राज्यांतील दारुण पराभवानंतर हा गट अधिक आक्रमकपणे सक्रिय झाला आणि पक्षाचा वारसा जपण्याची गरज अधोरेखित करत त्यांनी क्षमतावान नेतृत्वाची गरज थेट सोनिया गांधींकडे मांडली. दुर्दैवाने काँग्रेसकडे अध्यक्ष नसल्याने पक्षाची स्थिती केविलवाणी होत असून, अनेक जण पक्ष सोडून चालले असल्याने पक्षाची कार्यकारिणी बैठक बोलवा, अशी मागणी कपिल सिब्बल यांनी केली होती. या गटाची ओळख पुढे जी-२३ या नावाने काँग्रेसवर सावटासारखी कायम राहिली होती. सर्वसमावेशक नेतृत्व नसल्याने पक्षाची संघटनात्मक रचना कमकुवत झाली असून यापुढे हुजरेगिरी करत पक्षात राहणार नाही अशी स्पष्टोक्तीही सिब्बल यांनी तेव्हा केली होती. एका परीने ते बंड म्हणजे गांधी परिवाराच्या नेतृत्वालाच आव्हान मानले गेले आणि ते बंड झाल्यामुळेच, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर नामधारी का होईना, गांधी परिवाराचे एकनिष्ठ असलेले मल्लिकार्जुन खडगे यांची निवड पक्षाला करावी लागली. मात्र, खडगे यांच्याकडे पक्षाची धुरा असतानाही, राहुल गांधी हेच पक्ष चालवितात आणि त्यांच्या मर्जीखेरीज कोणत्याही निर्णयाचे, कृतीचे पान हलत नाही हेही वारंवार स्पष्ट झाले आहे. चिदम्बरम यांनी केलेले वक्तव्य ही तर केवळ सुरुवात आहे. २०१० पासून, म्हणजे अधिक नेमकेपणाने सांगावयाचे झाले तर राहुल गांधी यांना पक्षाचे नेतृत्व बहाल केले गेले तेव्हापासून देशातील अनेक निवडणुकांत सातत्याने हार पत्करावी लागत असताना, नेतृत्वाच्या क्षमतेवर बोट न ठेवता मूग गिळून स्वस्थ बसण्याची सहनशीलता आता कमी होत असल्याचे हे स्पष्ट संकेत आहेत. ▮

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# व्याप्त काश्मीरमधील होरपळ

व्याप्त काश्मीरमध्ये आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये अलिकडेच झालेल्या हिंसक चकमकीत तीन पोलिस अधिकाऱ्यांसह नऊ जणांचा मृत्यू झाला. दोन्ही बाजूंचे डझनभर लोक जखमी झाले. परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी संघीय सरकारने एक वाटाघाटी समिती पाठवली होती. नुकतीच व्याप्त जम्मू आणि काश्मीर संयुक्त अवामी कृती समिती (जेएएसी) सोबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यासाठी ती मुझफ्फराबाद येथे पोहोचली होती. ही समिती व्यापाऱ्यांचे आणि नागरी समाज गटांचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख संघटना आहे, जी संपूर्ण प्रदेशातील तळागाळातील असंतोषाचा आवाज म्हणून उदयास आली आहे. या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, कार्यकर्ते शौकत नवाज मीर यांच्या नेतृत्वाखाली 'जेएएसी'ने आयोजित केलेला बंद २९ सप्टेंबर रोजी सुरू झाला. त्यामुळे व्याप्त काश्मीरमधील अनेक जिल्हे, ज्यांना स्थानिक पातळीवर आझाद जम्मू आणि काश्मीर (एजेएके) म्हणून ओळखले जाते, ते पूर्णपणे ठप्प झाले. सरकारने तिथे २८ सप्टेंबरपासून संपूर्ण संप्रेषण ब्लॅकआऊट लागू केले आहे, रहिवाशांचे मोबाईल टेलिकम्युनिकेशन आणि इंटरनेट कनेक्शन खंडित केले आहे. मुझफ्फराबादमधील गजबजलेल्या बाजारपेठा बंद आहेत, तर रस्त्यावर विक्रेतेही नाहीत. सार्वजनिक वाहतूक ठप्प आहे. या गोंधळामुळे प्रदेशातील सुमारे ४० लाख रहिवासी अनिश्चिततेच्या स्थितीत बुडाले आहेत. सरकारने एका निवेदनात म्हटले आहे की, अधिकारी सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी काम करत आहेत आणि जनतेला विशिष्ट अजेंडा घेऊन 'सोशल मीडिया'वर पसरवल्या जाणाऱ्या प्रचार आणि खोट्या बातम्यांनी प्रभावित होऊ नये, असे आवाहन केले आहे. गेल्या दोन वर्षांमधील या भागात हे तिसरे मोठे आंदोलन आहे. सरकारने समितीच्या ३८ सूत्री मागण्या मान्य न केल्यामुळे हे आंदोलन सुरू झाले. व्याप्त काश्मीरमधील स्थानिक सरकार आणि आंदोलकांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरू झालेला संघर्ष थांबायला तयार नाही. या संघर्षामागचे कारण जाणून घेतले पाहिजे. काश्मीर खोरे हा एक सुंदर; पण वादग्रस्त हिमालयीन प्रदेश आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान आणि भारतात अनेक युद्धे झाली आहेत. चीनचेदेखील या प्रदेशाच्या उत्तरेकडील दोन भागांवर नियंत्रण आहे. भारताने व्याप्त काश्मीर परत घेण्याची भाषा वारंवार वापरली आहे. चीन पाकिस्तानचा मित्र असला, तरी पाकिस्तान चीनने व्यापलेल्या भागांशिवाय संपूर्ण काश्मीरवर दावा करतो. २०१७ च्या जनगणनेनुसार व्याप्त काश्मीरची लोकसंख्या ४० लाखांहून अधिक आहे. व्याप्त काश्मीरला पंतप्रधान आणि विधानसभेला अर्ध-स्वायत्तता आहे. सध्याच्या अशांततेचे मूळ मे २०२३ मध्ये आहे. या भागातील नागरिक गगनाला भिडणाऱ्या वीज बिलांचा निषेध करण्यासाठी प्रथमच रस्त्यावर उतरले होते. पिठाची प्रचंड तस्करी आणि अनुदानित गव्हाच्या पुरवठ्यात तीव्र कमतरता असल्याच्या तक्रारी होत्या. ऑगस्ट २०२३ पर्यंत या वेगळ्या तक्रारींचे रूपांतर संघटित प्रतिकारात झाले.



त्या वर्षी सप्टेंबरमध्ये शेकडो कार्यकर्ते मुझफ्फराबादमध्ये जमले आणि त्यांनी औपचारिकपणे 'जेएएसी'ची स्थापना केली.

मे २०२४ मध्ये निदर्शकांनी मुझफ्फराबादकडे 'लाँग मार्च' सुरू केला, तेव्हा या आंदोलनाची पहिली मोठी तीव्रता दिसून आली. आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यात एका पोलिस अधिकाऱ्यासह किमान पाच जणांचा मृत्यू झाला. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पिठाच्या किमती आणि वीजदरात कपात यासारख्या प्रमुख मागण्या मान्य केल्या, तेव्हाच हिंसक निदर्शने थांबली. पीठ परवडणाऱ्या दरात मिळावे आणि वीजदरात कपात करावी, यासाठी सरकारने अब्जावधी रुपयांचे अनुदान वाटप केले. तथापि, ही शांतता फार काळ टिकली नाही. त्याच वर्षी ऑगस्टमध्ये 'जेएएसी'ने आणखी एक टाळेबंदी लागू करण्याची घोषणा केली. 'जेएएसी'ने सादर केलेल्या मागण्यांमध्ये ३८ विशिष्ट मुद्दे समाविष्ट आहेत. या मागण्यांमध्ये मोफत शिक्षण आणि आरोग्य सेवा प्रदान करणे, मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू करणे आणि प्रांतीय कायदेमंडळाची रचना बदलणे यांचा समावेश आहे. या यादीच्या वरच्या भागात सत्ताधारी वर्गाचे विशेषाधिकार संपवण्याची मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मागील तक्रारींमध्येदेखील अधोरेखित करण्यात आली होती. 'जेएएसी' ने म्हटले आहे की, मे २०२४ च्या निषेधानंतर सरकारने वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या विशेषाधिकारांचा आढावा घेण्यासाठी न्यायिक आयोगाची स्थापना मान्य केली.

'जेएएसी'च्या यादीत पहिल्यांदाच समाविष्ट केलेली दुसरी प्रमुख मागणी स्वायत्त प्रदेशाच्या विधानसभेत निर्वासितांसाठी राखीव असलेल्या बारा जागा रद्द करण्याशी संबंधित आहे. 'जेएएसी'च्या मते १९४७ च्या फाळणीनंतर भारताच्या काश्मीरमधून गेलेल्या निर्वासितांनी आणि त्यांच्या वंशजांनी आता एक शक्तिशाली राजकीय गट तयार केला आहे. त्यांनी विकासनिधीची मक्तेदारी केली आहे. २०२३ आणि २०२४ च्या निषेधादरम्यान कार्यकर्त्यांवर दाखल केलेले कायदेशीर खटले मागे घेण्याची मागणीदेखील या सनदेत करण्यात आली आहे. मागण्यांमध्ये करसवलती आणि चांगल्या रोजगाराच्या संधींचा समावेश आहे. पायाभूत सुविधांचा विकास हा 'जेएएसी'च्या दृष्टिकोनाचा एक प्रमुख केंद्रबिंदू आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाव्यतिरिक्त समितीने बोगदे आणि पूल यासह नवीन प्रकल्पांची मागणी केली आहे, जे पर्वतीय प्रदेशाला उर्वरित पाकिस्तानशी जोडतील. मुझफ्फराबादमध्ये सध्या एक विमानतळ आहे; परंतु ते वर्षानुवर्षे बंद आहे. तथापि, या वर्षी एप्रिलमध्ये पंतप्रधान शरीफ यांनी या प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एक समिती स्थापन केली.

ताज्या अस्वस्थतेनंतर मात्र येथे स्थानिक प्रशासनाने दळणवळण बंद केले असून, शैक्षणिक संस्था अनिश्चित काळासाठी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्याहूनही वादग्रस्त म्हणजे त्यांनी अर्धसैनिक दलांसह उर्वरित पाकिस्तानमधून अतिरिक्त पोलिस तुकड्या बोलावल्या आहेत. पाकिस्तानी संघराज्य सरकारने या संघर्षात नऊ जणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे; परंतु वरिष्ठ स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनी मृतांची संख्या १५ असल्याचे सांगितले आहे. 'जेएएसी'ने अर्धसैनिक दलांच्या तैनातीवर आक्षेप घेतला आहे. 'जेएएसी' नेते मीर यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला पत्रकारांना सांगितले की, स्थानिक पोलिस आधीच उपस्थित असल्यामुळे मुख्य भूमी पाकिस्तानमधून निमलष्करी दलांना बोलावण्याची गरज नाही. व्याप्त काश्मीरचे अर्थमंत्री अब्दुल मजीद खान यांनी कबूल केले की, चर्चेची पहिली फेरी आधीच झाली असली, तरी आता एक नवीन समिती मुझफ्फराबादमध्ये आली आहे. तिला निदर्शकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याचे काम देण्यात आले आहे. उपखंडाच्या फाळणीच्या वेळी झालेल्या गैरसोयीकडे लक्ष वेधून मंत्र्यांनी निर्वासितांसाठी राखीव जागा रद्द करण्यामागील तर्काला आव्हान दिले. खान यांनी युक्तिवाद केला की हे असे लोक आहेत, ज्यांचे कुटुंब भारतातून आले होते. तिथे ते जमीनदार आणि व्यापारी होते; परंतु त्यांची मालमत्ता मागे सोडून अत्यंत गरिबीत पाकिस्तानात पळून गेले. 'जेएएसी'ला वाटते की त्यांना जागांचा कोटा देणे अन्यायकारक आहे. मंत्री स्वत: या प्रदेशातील अंदाजे २.७ दशलक्ष लोकांमध्ये आहेत, ज्यांच्या कुटुंबांनी भारताच्या काश्मीरमधून स्थलांतर केले. दरम्यान, 'जेएएसी'च्या बहुतांश मागण्या पूर्ण झाल्या आहेत, असा दावा करून खान यांनी पुन्हा निदर्शने करण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित केला. सरकारी प्रतिनिधी आणि 'जेएएसी' सदस्यांमधील चर्चा कोणत्याही तोडग्याशिवाय संपली. त्यानंतरही दोन्ही बाजूंनी संवादासाठी वचनबद्धता व्यक्त केली; परंतु वारंवार आश्वासने आणि निराशेनंतर सरकारविरोधात अविश्वास वाढत चालला आहे. या भागातील नाराजी आणि अस्वस्थता किती लवकर संपेल हे काळच सांगेल. तथापि, सध्याची परिस्थिती पाहता निदर्शकांच्या अलिकडच्या मृत्यूंमुळे लोक खूप संतापले आहेत आणि प्रभावित झालेल्यांना इतक्या लवकर शांत करणे कठीण आहे, असे दिसते. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# भ्रष्टाचारविरोधी लढा तीव्र करण्याची गरज

केंद्रात बहुमतासह सत्तेत येताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ना खाऊंगा और ना खाने दूंगा।' असा विश्वास देशाला दिला होता. त्यादृष्टीने सरकारने बरीच मजल गाठली आहे. शासकीय कामकाजात बऱ्याअंशी पारदर्शकता आली आहे. परंतु, प्रशासकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार अद्याप पाहिजे त्या प्रमाणात कमी होऊ शकलेला नाही. नोकर भरती आता पारदर्शक पद्धतीने केली जाते. गुंडगिरी आणि गुंडांना असलेला राजाश्रय भाजपा सरकारने पार मातीत गाडला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता भयमुक्त झाली असून जनतेच्या मनातील भाजपाचे स्थान आणखी मजबूत झाले आहे. मोदी सरकारमधील एकाही मंत्र्यावर ठोस पुराव्यांसह आजपर्यंत कोणी आरोप करू शकलेला नाही किंवा सरकारमधील एकावरही आरोप सिद्ध होऊ शकलेला नाही, हे या सरकारचे सर्वांत मोठे यश होय. ९ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचारविरोधी दिन पाळला जातो. सामान्यत: मोठी लोकसंख्या आणि गरिबी या दोन बाबी भ्रष्टाचाराला खतपाणी घालतात. अशाही परिस्थितीत सर्वाधिक लोकसंख्या असूनही भारतात दिवसेंदिवस गरिबीसह भ्रष्टाचारही कमी होत आहे. ही समाधानाची बाब आहे. पूर्वी सरकारातील मंत्रीच भ्रष्टाचार करून देशाची होईल तितकी लूट करायचे. आता हा प्रकार कमी झाला आहे. भ्रष्टाचारी लोकांवर सरकारचा वचक निर्माण झाला आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी मानसिकतेला लगाम लागला असून कारवाईचा धाक वाढला आहे. आपल्याकडील कायदे भ्रष्टाचाराच्या बाबतीत बऱ्याचअंशी सौम्य असल्याने भ्रष्टाचारी अधिकारी-कर्मचारी पळवाटा शोधण्यात यशस्वी होतात. त्यामुळे आगामी काळात कायद्यांत बदल करून भ्रष्टाचारविरोधी लढा तीव्र करावा लागेल. भ्रष्टाचार संपविणे हे केवळ सरकारचे काम नाही. यात नागरिकांनीही होईल तितके योगदान दिले पाहिजे.

पूर्वी स्वस्त धान्य दुकानांमधून शासकीय मालमत्तेची लूट केली जायची. शाळा, महाविद्यालये अथवा पोलिस प्रशासनात वशिला आणि डोनेशनशिवाय नोकरीच मिळत नव्हती. हा प्रकार आता खूपच कमी झाला आहे. परिणामी, योग्य उमेदवारांना संधी प्राप्त होऊन गुणवत्ता राखली जात आहे. पोलिस प्रशासनात अधिकारी म्हणून देशप्रेमी तरुणांची संख्या वाढत आहे. हा आपल्या संस्कृतीचा सर्वांत मोठा विजय आहे. टीआय या संस्थेच्या अहवालानुसार, भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताचा क्रमांक १८० देशांपैकी ८५ वा आहे. २०१३ मध्ये देश ९४ व्या क्रमांकावर होता. भाजपा सरकार सत्तेत आल्यानंतर बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाली आहे. पूर्वीच्या तुलनेत परिस्थिती बरी असली तरी आणखी बराच पल्ला गाठायचा आहे. त्याशिवाय देशाला परम् वैभव प्राप्त करून देणे शक्य होऊ शकत नाही. भाजपा सरकारने सार्वजनिक वस्तू आणि समाजकल्याण उपक्रमांमध्ये पारदर्शकता आणली आहे. आता कुठल्याही योजनेचा लाभ थेट लाभार्थींना मिळतो. पूर्वी दिल्लीतून निघालेले एक लाख रुपये लाभार्थीपर्यंत पोहोचेपर्यंत दहा-वीस हजार रुपये इतक्याच मर्यादित उरायचे! हा पैसा नेमका कुठे मुरायचा, या प्रश्नाचे उत्तर देशाला हवे आहे. मनी लॉण्ड्रिंग आणि संबंधित भ्रष्टाचारांच्या प्रकरणांत कारवाई करण्यासाठी अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडी या संस्थेची स्थापना करण्यात आली. परंतु, ही संस्था त्याकाळी केवळ नामधारी होती. कारवाईच होत नसल्याने राजकारणी लोकांना भ्रष्टाचार करण्यासाठी रान मोकळे होते. मोदी सरकारच्या काळात ईडीने १.१९ लाख कोटी रुपयांची मालमत्ता भ्रष्टाचाऱ्यांकडून जप्त केली. २०२४ ते २५ या काळात ईडीने २१ हजार ३७० कोटींची मालमत्ता जप्त केली. विरोधकांकडून ईडीचा वापर राजकीय दबावासाठी केला जात असल्याचा आरोप वारंवार केला जातो. परंतु, मोदी सरकार भ्रष्टाचार निपटून काढण्यावर ठाम आहे. गेल्या १० वर्षांत १९३ नेत्यांवर ईडीने गुन्हे नोंदविले आहेत. देशाची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असली तरी आपल्याला आपले उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर भ्रष्टाचार निपटून काढावाच लागेल आणि यासाठी कायदे कठोर करून भ्रष्टाचारविरोधी लढा तीव्र करण्याशिवाय गत्यंतर नाही. ▮

९८८१७१६०२७

## प्रासंगिक

**विजय पांढरीपांडे**

# शिक्षण आणि शहाणपण

शिक्षणाने माणूस खरंच शहाणा होतो का? नुकत्याच चर्चेत आलेल्या एका घटनेने हा प्रश्न निर्माण झाला आहे. एका जुन्या प्रतिष्ठित स्वायत्त विद्यापीठाच्या ऑफिसर्स, उच्चपदस्थ शिक्षित व्यक्तींना सुमारे अडीच कोटीचा गंडा सायबर गुन्हेगाराने लावला आहे. तेही आयआयटीच्या मोठ्या प्रतिष्ठित प्राध्यापकाची नावे घेऊन. गुन्हेगाराला नुकतेच हैदराबाद येथून पकडण्यात आले. तो तेलुगू माणूस इंजिनीयर असून लंडन विद्यापीठातून त्याने पीएच. डी. केली आहे! तो प्राध्यापक राहिला आहे! संशोधनासाठी निधी मिळवून देतो असे आमिष दाखवून त्याने हा सायबर गुन्हा बेमालूमपणे केला. अर्थात महिन्याच्या आत त्याला शिताफीने पकडणाऱ्या सरकारी यंत्रणेचे निश्चितच कौतुक केले पाहिजे.

मुळात एखाद्या प्रतिष्ठित स्वायत्त खाजगी विद्यापीठाचे सुशिक्षित स्टाफ, अधिकारी अशा भूलथापांना बळी कसे पडू शकतात याचेच आश्चर्य वाटते. कारण संशोधन निधी, तोही लाखात, मंजूर करण्याच्या पद्धती असतात. नियम असतात. कुणी कुणाला असे आमंत्रण देऊन लाखोंचा निधी दान करणार नाही. हे फोन घेणाऱ्याला कळायला नको? शिवाय कुठल्याही अनुदानासाठी, संशोधन निधीसाठी कुठेही पैसे डिपॉझिट करावे लागत नाहीत. हेही या विद्यापीठाच्या सुशिक्षित पदवीधर अधिकाऱ्यांना कळत कसे नाही? याचा अर्थ सायबर गुन्हेगाराचे संभाषण कौशल्य, संमोहित करून जाळ्यात फसविण्याचे प्रभावी तंत्र याचेही कौतुक केले पाहिजे. एरवी अशा कॉलला प्रतिसाद देताना, त्यावर पैसे पाठविण्याची कृती करताना माणूस आधी दहादा विचार करेल. यावरून फसवणारा अन् त्याच्या जाळ्यात फसणारा अशा दोनही सुशिक्षितांच्या कृती आश्चर्यकारक ठरतात.

इलेक्ट्रॉनिक बँकिंग, ई-ट्रान्स्फर अशा बँकिंग सुविधांमुळे एकीकडे वेळेची बचत, अन् इतर फायदे झालेत. पण दुसरीकडे धोके देखील वाढली आहे. आता तर काही बँकेचे कर्मचारीही यात गुंतले असल्याचे बोलले जाते.



खरे खोटे देव जाणे! आजकाल अनेक ठिकाणी पैशांची देवघेव कॅशमध्ये होत नाही. त्यामुळे तुम्हाला तुमचे बँक डिटेल्स द्यावेच लागतात. पेन्शन, पगार, कर विभाग, अशा अनेक ठिकाणी आपण आपले बँक डिटेल्स देतो. हेही आता धोक्याचे असू शकते.

खरे तर अशा सायबर क्राईमच्या अनेक घटना बातम्यांतून कळतात. तरी आपण सुशिक्षित मंडळी या जाळ्यात फसतो. वाढत्या सोशल मीडियाच्या प्रवाहात तुमचा फक्त बँक अकाऊंट नव्हे तर तुम्हीही नकळत हॅक होता आहात. तुमची बहुतेक माहिती आता अनेक ई-प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाली आहे. तुमच्या आवडीनिवडीवर या मीडियाचे नियंत्रण आहे. तुमचे मित्र, नातेवाईक, त्यांच्याशी होणारे तुमचे संभाषण, टेक्स्ट, व्हिडीओची देवघेव, भावनिक गुंतवणूक सारे काही या यंत्रणेच्या मुठीत साठवले आहे, बंदिस्त आहे. यापुढे तर मानवावरील हे एआयएमएलचे मशीन नियंत्रण वाढतच जाणार आहे. सायबर गुन्ह्यात तरी काय घडते? तुमचे तुमच्यावरील नियंत्रण तुमच्या हातात नसते! ते तुम्हाला फसवणाऱ्या सायबर तंत्राच्या, सायबर गुन्हेगाराच्या हातात असते. तो तुम्हाला कठपुतलीसारखे नाचवतो. तुम्ही त्या जाळ्यात आपला विवेक, आपली बुद्धी गहाण ठेवून फसत जाता.

आजकाल सोयीचे म्हणून घरबसल्या खरेदीचे प्रमाण देखील खूप वाढले आहे. हाही आर्थिक व्यवहार हाताच्या मोबाईलवर होत असतो. अनोळखी व्यक्तीकडून देवघेव होते. वस्तू घेणे, न पटली तर परत करणे हे सगळे वेळ, जाण्या-येण्याचे कष्ट वाचविण्याच्या दृष्टीने सोयीचे वाटत असले तरी यात अप्रत्यक्षरीत्या तुमची किती कशी फसवणूक होते याचा तुम्हाला पत्ताही लागत नाही. तुम्ही तुमच्या घरच्या, ऑफिसच्या कामात इतके व्यस्त असता की अनेक व्यवहार तुमच्या लक्षातही राहत नाहीत. तुमच्या या व्यस्त मानसिक अवस्थेचा फायदा विकणारी संस्था घेत असते. तुम्ही जाळ्यात फसता, तुम्हाला गंडवले जाते हे तुम्हाला कळत देखील नाही.

म्हणूनच सुरुवातीला विचारलेला प्रश्न महत्त्वाचा ठरतो. आपण शिक्षण घेऊनही शहाणे होतो की नाही? सोशल मीडियामुळे तर माहितीचा पूर येतो आहे. पण या माहितीने आपण वाहवत जातो. आपले खेळणे होऊन जाते. ज्याच्या किल्ल्या दुसऱ्या कुणा अजाण अमानवी यंत्रणेच्या हातात नकळत जातात. आपण त्या अदृश्य हाताच्या तालावर नाचायला लागतो वेड्यासारखे. आधी सांगितलेली घटना याचीच साक्ष देते! म्हणूनच यापुढे प्रत्येक पावलावर सावधगिरी बाळगणे गरजेचे झाले आहे. ताक देखील फुंकून प्यावे म्हणतात. तसेच हे... सोशल मीडिया म्हणा,इंटरनेटचे जाळे म्हणा, ई सुविधा म्हणा, त्याचे फायदे असले तरी तोटेही आहेतच. धोके ओळखण्याइतपत आपण सुशिक्षित असूनही शहाणे नसतो, सावध नसतो, विवेकी नसतो हेही तितकेच खरे आहे. मानवी उत्क्रांतीमध्ये गेल्या काही दशकात कमालीचा वेग आला आहे. या शर्यतीमध्ये माणसाची दमछाक होते आहे हेही तितकेच खरे. खरे काय खोटे काय, सत्य काय वास्तव काय, फायद्याचे काय, नुकसानकारक काय हे निर्णय घेणे सुशिक्षितासाठी देखील कठीण होऊन बसले आहे. जे तंत्रज्ञान आपणच निर्माण केले ते आता आपल्याला फसवायला, प्रसंगी आपला जीव घ्यायला निघाले आहे. हा एक प्रकारचा शैक्षणिक विरोधाभास देखील म्हणता येईल. अशा संभ्रमावस्थेत अर्जुनाला हाताशी श्रीकृष्ण तरी उभा होता. इंटरनेट सोशल मीडियाच्या कुरुक्षेत्रावर आपण कोणत्या कृष्णाचा धावा करायचा हाही गंभीर प्रश्न आहेच. ▮

७६५९०८४५५५

## आजचे संघगीत-१२

मंगळवार, १४ ऑक्टोबर २०२५

### मनसा सततं स्मरणीयम्

मनसा सततं स्मरणीयम्
वचसा सततं वदनीयम्
लोकहितं मम् करणीयम् ॥धृ.॥

न भोगभवने रमणीयम्
न च सुखशयने शयनीयम्
अहर्निशं जागरणीयम्
लोकहितं मम् करणीयम् ॥१॥

न जातु दु:खं गणनीयम्
न च निज सौख्य मननीयम्
कार्यक्षेत्रे त्वरणीयम्
लोकहितं मम् करणीयम् ॥२॥

दु:खसागरे तरणीयम्
कष्टपर्वते चरणीयम्
विपत्तिविपिने भ्रमणीयम्
लोकहितं मम् करणीयम् ॥३॥

गहनारण्ये घनांधकारे
बन्धुजना ये स्थिता गह्वरे
तत्र मया संचरणीयम्
लोकहितं मम् करणीयम् ॥४॥

## वाचक पत्रे

### वक्तृत्व काळाची गरज

वक्तृत्व ही व्यक्तीच्या विचारसंपन्नतेची, भाषण कौशल्याची आणि प्रभावी संवादाची कला आहे. समाजात आपली मते प्रभावीपणे मांडण्यासाठी, लोकांना प्रेरित करण्यासाठी आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी वक्तृत्वाची गरज भासते. आजच्या युगात वक्तृत्वाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. वक्तृत्व हे केवळ भाषणाची कला नाही, तर ती व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे. योग्य शब्दांची निवड, योग्य वेळेवर योग्य संदेश देण्याची कला आणि प्रेक्षकांशी संवाद साधण्याची क्षमता या सर्वांचा समावेश त्यात होतो. समाजात नेतृत्व, शिक्षण, राजकारण आणि सामाजिक कार्यात वक्तृत्वाची भूमिका अनन्यसाधारण आहे.

वक्तृत्व काळाची गरज का आहे? कारण आजच्या वेगवान जगात, जिथे माहितीचा प्रवाह प्रचंड आहे, तिथे प्रभावी संवादाचाच विजय होतो. लोकांना प्रेरित करणे, समजूतदारपणे विचार मांडणे आणि सामाजिक बदलासाठी प्रोत्साहन देणे हे सर्व वक्तृत्वाशिवाय शक्य नाही. याशिवाय, व्यक्तीचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी, निर्णय घेण्याच्या क्षमतेस मदत करण्यासाठी वक्तृत्व आवश्यक आहे. ती काळाची गरज आहे, कारण ती व्यक्तीला आपल्या विचारांना प्रभावीपणे व्यक्त करण्याची क्षमता देते. आधुनिक युगात, नेता, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांसारख्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी आपला प्रभाव वाढवण्यासाठी वक्तृत्वाची आवश्यकता आहे. योग्य भाषण आणि प्रभावी संवादांमुळे समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. संवाद कौशल्य आणि आपली मते प्रभावीपणे व्यक्त करण्याची कला आहे. आजच्या युगात योग्य वेळेवर, योग्य शब्दांनी आपली भूमिका साकारता येते, यामुळे विचारांची देवाणघेवाण सुलभ होते, नेतृत्वक्षमता विकसित होते आणि समाजात सकारात्मक बदल घडवता येतात.

शेवटी, वक्तृत्व ही केवळ भाषणाची कला नाही, तर ती समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेली एक महत्त्वाची कला आहे. प्रत्येकाला आपल्या विचारांना प्रभावीपणे व्यक्त करण्याची क्षमता विकसित करावी, जेणेकरून एक सुसूत्र, प्रगतिशील आणि सशक्त समाजाची स्थापना होईल. म्हणून, वक्तृत्व काळाची गरज आहे आणि त्यासाठी शिक्षण व सराव आवश्यक आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### मध्य-पूर्व नागपुरातील पार्किंगची समस्या

सध्या मध्य नागपूर, पूर्व नागपुरात उड्डाणपुलांचे काम जोरात सुरू आहे. परंतु हे काम करताना प्रशासनाने उड्डाणपुलाखालील पार्किंगची व्यवस्था कशी राहील याबद्दल जरा जागृती केली असती तर बाजारात येणाऱ्या नागरिकांना फार सोयीचे झाले असते. कारण महाल विभागात, तसेच पूर्व नागपूर भागातील सेंट्रल एव्हेन्यूमधील उड्डाणपुलाच्या खालच्या मोकळ्या जागेत प्रशासन शोभेकरिता झाडे लावत असून, त्यामुळे बाजारात वाहनाने येणाऱ्या लोकांना आपले वाहन कुठे उभे करावे, हा प्रश्न पडतो. ग्राहक आपल्या दुकानात येणार नसेल तर दुकानदार लोकांना आपल्या दुकानासमोर वाहन उभे करू देत नाही. तेव्हा आता दिवाळी आणि सण, उत्सवाच्या दिवसात उड्डाणपुलाखाली लोकांना वाहन उभे करण्याची परवानगी मिळावी. स्थानिक दुकानदारांनीही समंजस भूमिका घ्यावी, जेणेकरून त्यांचा ग्राहकांशी वाद होणार नाही. ▮

**विवेक भालेकर**/९४२३१०५२९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### पशुवैद्यक महाविद्यालयात जागतिक अंडी दिनानिमित्त अंडी जनजागृती कार्यक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** विस्तार शिक्षण संचालक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यक व पशु विज्ञान महाविद्यालय, परभणी येथे जागतिक अंडी दिनानिमित्त १० ऑक्टोबर रोजी अंडी जनजागृती कार्यक्रमआयोजित करण्यात आला होता. महाविद्यालय स्तरावर तसेच विद्यापीठाच्या दत्तक गावांमध्ये गेल्या वर्षभरात अंडी जनजागृती अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले असून, त्याच्या अनुषंगाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर होते, तर डॉ. चंद्रकांत मामडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुरुवातीला सह-समन्वयक व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. काकासाहेब खोसे यांनी उपस्थितांना अंड्याविषयीचे गैरसमज दूर करून आहारातील त्याचे पोषणमूल्य स्पष्ट केले. नोडल अधिकारी डॉ. म्हाळसाकांत निकम यांनी ङ्गआहारातील अंड्यांचा समावेशफ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, अंडी ही उच्च दर्जाचे आणि परवडणारी प्रथिनांची स्रोत असून त्यात कोणतीही भेसळ नसते. अंडी आणि दूध या दोन्हींत जैविक मूल्य जवळपास समान असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. एम. जी. निकम (प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग) यांनी अंड्याचे वैज्ञानिक व पोषणदृष्ट्या महत्त्व अधोरेखित केले, तर प्रमुख पाहुणे डॉ. चंद्रकांत मामडे यांनी अंड्याचे दैनंदिन आहारातील स्थान आणि त्याबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्याचे आवाहन केले. अध्यक्ष डॉ. सुधीर राजूरकर यांनी अंडी जनजागृती अभियानाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा आढावा घेत, विद्यार्थ्यांना संतुलित आहारात अंड्याचा समावेश करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी वाटप करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हनुमंत मानेमूद (पदव्युत्तर विद्यार्थी) यांनी केले, तर आभार प्रदर्शन तेजस पिसाळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. प्रकाश केकान, डॉ. विठ्ठल मुंडे, डॉ. गोविंद गंगणे, डॉ. बळीराम कातकडे, डॉ. नितीन जाधव, डॉ. कल्याण टेकाळे, डॉ. श्रीकांत कळवाघे, डॉ. संजय लोंढे, डॉ. मकरंद खरवडकर, सहाय्यक कुलसचिव ऋषिकेश कांबळे, तसेच पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. अक्षय भुते, डॉ. निखिल शिंदे, तेजस पिसाळ आणि हनुमंत मानेमूद यांनी परिश्रम घेतले.

### एचएआरसीतर्फे ५४ अनाथ बालकांना दिवाळी किट, ७ मुलींना नवीन ड्रेस वाटप : दिवाळी दान महोत्सव उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेतर्फे दिवाळी दान महोत्सवाच्या निमित्ताने सेलू येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील ५४ अनाथ व निराधार मुला-मुलींना दिवाळी किट, तसेच ७ एकल पालक मुलींना नवीन ड्रेसचे वाटप करण्यात आले.

एचएआसी संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी दान महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे यंदाचे पंधरावे वर्ष असून, समाजातील गरजूंना आनंदाने दिवाळी साजरी करता यावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येतो. या संस्थेच्या वतीने आज सेलू येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील ५४ अनाथ व निराधार मुला-मुलींना दिवाळी किट, तसेच ७ एकल पालक मुलींना नवीन ड्रेसचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. पवन चांडक, रवी मंत्री, अ‍ॅड. चंद्रकांत राजुरे, सुनिता वेडे, शरद ठाकर, रामराव बोबडे, रामराव गायकवाड व लक्ष्मण गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी जिल्हा परिषदेच्या रायपूर, राणी वाहेगाव (परतूर), खैरी, पार्डी, केमापूर, कान्हड, भांगापूर, देवळगाव गात, मापा, बोरगाव, पिंपरी, पिंपळगाव गोसावी, मालेटाकळी, कुंडी, हदगाव, गिरगाव, गव्हा या शाळांमधील ५४ एकल पालक व अनाथ मुलांची निवड करण्यात आली होती.

वाटप करण्यात आलेल्या दिवाळी किटमध्ये साडी, फराळाचे पदार्थ (फरसाण, शंकरपाळे, बाकरवडी, चकली, बालुशाही), तसेच मोती साबण, सुगंधी तेल, उटणे, टूथपेस्ट, ब्रश, कंगवा, ब्लँकेट, चिक्की, राजगिरा लाडू, पॉड्स पावडर, शॅम्पू आदी वस्तूंचा समावेश होता, अशी माहिती डॉ. पवन चांडक यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग पाटणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन माधव गव्हाणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वरद जाजू, लखन उगीले, राजेभाऊ गिते, राम रोडगे आणि कालिदास राऊत यांनी परिश्रम घेतले.

### कोल्हापूर ते नागपूर एक्सप्रेसमधून प्रवाशाचे १४ लाखांचे दागदागिणे लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** कोल्हापूर ते नागपूर या रेल्वे प्रवासा दरम्यान अज्ञात चोरट्यांनी पाळत ठेऊन एका प्रवाशाची सोन्या-चांदीचे दागदागिणे असणारी बॅग लंपास केली. त्या बॅगेत १४ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल होता. दरम्यान, या प्रकरणात गणेश शांतीलाल राठी या प्रवाशाने पूर्णा लोहमार्ग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

राठी दाम्पत्य एक्सप्रेसने प्रवास करीत होते. पूर्णा रेल्वेस्थानकावरुन एक्सप्रेस बाहेर पडल्यानंतर या दाम्पत्यास बॅग चोरीस गेल्याची बाब निदर्शनास आली. त्या बॅगेत सोन्याचे नेकलेस, कानातील झुमके, अंगठी, मोबाईल, चांदीचे पायातील जोडवे होते. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात तपास सुरु केला आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# परभणी जिल्हा परिषद सदस्यांचे आरक्षण निश्चित

**परभणी /प्रतिनिधी-** परभणी जिल्हा परिषद सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज सोमवार १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडला.

जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२५ अन्वये आरक्षण कार्यक्रम दिल्याप्रमाणे परभणी जिल्हा परिषदेच्या एकूण ५४ निवडणूक विभागाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आज पार पडला. त्यानुसार निवडणूक विभागास आरक्षण निश्चीत करण्यात आले आहे. परभणी ल्हिा परिषदेतील निवडणूक विभागनिहाय आरक्षणाचा तपशील तालुकानिहाय पुढीलप्रमाणे दिले आहे.

जिंतूर तालुक्यात १-वझर बु.- सर्वसाधारण, २-वाघी धानोरा - नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग. ३-सावंगी म्हाळसा- अनुसूचित जाती (महिला) ४-आडगाव बाजार अनुसूचित जमाती ५-भोगाव सर्वसाधारण ६-वरुड नागरिकांचा मागासप्रवर्ग (महिला) ७-चारठाणा सर्वसाधारण महिला ८-बोरी सर्वसाधारण महिला ९-वस्सा सर्वसाधारण महिला १०-कौसडी सर्वसाधारण

परभणी तालुक्यात ११-झरी सर्वसाधारण १२-टाकळी बोबडे सर्वसाधारण महिला १३-टाकळी कुं. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) १४-पेडगाव सर्वसाधारण १५-जांब नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग १६- पिंगळी अनुसूचित जाती (महिला) १७-सिंगणापूर सर्वसाधारण १८-लोहगाव सर्वसाधारण १९-पोखर्णी(नृसिंह) सर्वसाधारण महिला २०-दैठणा सर्वसाधारण महिला

मानवत तालुका २१-कोल्हा सर्वसाधारण २२-ताडबोरगाव सर्वसाधारण २३-केकरजवळा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग(महिला) २४-रामपुरी बु. सर्वसाधारण महिला

सेलू तालुका २५-चिकलठाणा बुद्रूक सर्वसाधारण २६-वालूर सर्वसाधारण महिला २७-कुपटा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग २८-रवळगाव नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) २९-देऊळगाव गात सर्वसाधारण महिला

पाथरी तालुका ३०-हदगाव बु. सर्वसाधारण ३१-देवनांद्रा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) ३२-कासापुरी सर्वसाधारण ३३-बाभळगाव सर्वसाधारण महिला ३४-लिंबा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग

सोनपेठ तालुका ३५-शेळगाव म. सर्वसाधारण ३६-नरवाडी सर्वसाधारण महिला ३७- उखळी बु. अनुसूचित जाती (महिला)

पूर्णा तालुका ३८-एरंडेश्वर सर्वसाधारण ३९-चुडावा अनुसूचित जाती ४०-कावलगाव अनुसूचित जाती(महिला) ४१- गौर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग(महिला) ४२-ताडकळस अनुसूचित जाती ४३-वझुर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग याप्रमाणे अन्य तालुक्यातील जिल्हा परिषदेतील सदस्यांचे आरक्षण जाहिर करण्यात आले आहे.

## 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्यात दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या काळात राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या विशेष आरोग्य अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानांतर्गत एकूण २,३०,६५३ आरोग्य शिबिरे घेण्यात आली, ज्यामध्ये ३,४१३ विशेष शिबिरांचा समावेश होता. या शिबिरांमध्ये तब्बल १ कोटी ८ लाख ५९ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, यापैकी ३२ लाख ७१ हजार पुरुष आणि ७५ लाख ८७ हजार महिला लाभार्थी ठरल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सेवा हाच संकल्प, भारत हीच पहिला प्रेरणा .... ७५ वर्षे' यानुसार राष्ट्रीय स्तरावर स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान देशात राबविण्यात आले. महाराष्ट्रात आरोग्य विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्त्रीशक्तीला आरोग्य शक्तीची साथ देण्यासाठी आणि महिला आरोग्य व सशक्तीकरणाला प्राधान्य देण्यासाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे अभियान राबविले गेले. या अभियानांतर्गत महिला आणि बालकांच्या आरोग्य तपासणीसह विविध जनजागृती उपक्रम आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन जिल्हा आणि महापालिका स्तरावर करण्यात आले.

या अभियानादरम्यान विविध आरोग्य घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. असंसर्गजन्य आजारांवरील तपासण्या मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्या. १४ लाख ४१ हजार ६४८ नागरिकांची रक्तदाबासाठी तर १४ लाख ९८ हजार २१९ नागरिकांची मधुमेहासाठी तपासणी करण्यात आली. कर्करोग तपासणी अंतर्गत ६ लाख १८ हजार ३९३ मुख कर्करोग, ३ लाख २० हजर १६४ स्तनाच्या आणि २ लाख ४१ हजार १४८ आहेत.

## परभणीतील अस्थिव्यंग रुग्णालयात संपूर्ण सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी येथील अस्थिव्यंग रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कमरेच्या सांध्याच्या संपूर्ण सांधे प्रत्यारोपणाच्या दोन शस्त्रक्रिया ६ ऑक्टोबर रोजी यशस्वीरित्या पार पडल्या. या शस्त्रक्रियांसाठी खाजगी रुग्णालयात सुमारे दीड ते दोन लाख रुपये खर्च येतो. मात्र, या योजनेअंतर्गत दोन अतिशय गरजू रुग्णांवर या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आल्या.

या शस्त्रक्रियांसाठी छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिध्द कृत्रिम सांधेरोपण शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. वैभव गोल्डे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते. अस्थिव्यंग रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल भालेराव यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. या कार्याला जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश लखमावार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे आणि वैद्यकीय अधीक्षक तथा अति. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सारिका बडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

शस्त्रक्रियेच्या यशामध्ये अस्थिव्यंग रुग्णालयातील डॉ. शबिहू अहेमद, डॉ. निखील व्याळे, भूलतज्ञ डॉ. शरद नयपरे तसेच सहाय्यक डॉक्टर डॉ. शाकीर उल करीम, डॉ. निलेश पवार, डॉ. गणेश पारवे आणि परिचारिका श्रीमती शेळके, श्रीमती मुराडी, श्रीमती भुरे, श्रीमती इनामे आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत संत भगवानबाबा आश्रमशाळा इटोली चे घवघवीत यश

**परभणी /प्रतिनिधी-** जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत संत भगवानबाबा आश्रमशाळा इटोली चे घवघवीत यश मिळविले आहे.

परभणी क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र शासन आणि जिल्हा क्रीडा कार्यालय परभणी द्वारा आयोजित मैदानी स्पर्धेत संत भगवानबाबा माध्य व उच्च माध्य आश्रमशाळा इटोली ता. जिंतूर येथील खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात घवघवीत यश संपादन केले व विभागीय स्पर्धे साठी हे खेळाडू परभणी जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत.यामध्ये हातोडा फेक - १७ वर्ष वयोगट कार्तिक मदन दराडे (प्रथम ) धावणे -१०० मी. व २०० मी कु.सुष्मिता संजय राठोड (प्रथम) १५०० मी. धावणे



रितेश संतोष चव्हाण (द्वितीय) गोळा फेक १९ वर्ष वयोगट कु. सुष्मिता संजय राठोड (द्वितीय) सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन श्री रामेश्वरजी मुंडे साहेब, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग परभणी, संस्थेचे अध्यक्ष श्री प्रतापराव घुगे, सचिव श्री केशव घुगे, संचालक श्री विठ्ठल घुगे,प्राचार्य श्री रमेश दराडे तसेच आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले .या खेळाडूंना क्रीडा शिक्षक श्री प्रदीप राठोड सर यांचे मार्गदर्शन लाभले.

## भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व जिल्हयाच्या पालकमंत्री यांच्या उपस्थितीत काकडे यांचा भाजप प्रवेश

**जिंतूर,/प्रतिनिधी-** आंबेडकरी चळवळीतील सक्रिय राहणारे जिंतूर तालुक्यातील युवा नेतृत्व गणेश गुलाबराव काकडे यांनी दि ०७/१०/२०२५ रोजी भारतीय जनता पक्षात मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण साहेब, पालकमंत्री ना. मेघनादिदी बोर्डीकर यांच्या हस्ते जाहीर प्रवेश केला. ज्येष्ठ नेते रामप्रसादजी बोर्डीकर साहेब, अविनाश भाऊ काळे ,भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेशराव भुमरे, भाजपा तालुका अध्यक्ष गोविंद मामा थिटे, नानासाहेब राऊत, राजेंद्रजी नागरे,यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षकार्याला बळकटी देऊ, हा विश्वास देऊ इच्छितो.




नामदार सौ मेघना बोर्डीकर साकोरे यांच्या कार्यपद्धीला व विचारणांना प्रभावी होऊन आज भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. समाजकार्याच्या विकासाचा हा प्रवास आता नव्या उर्जेनं, नव्या संघटनशक्तीच्या साथीनं सुरू होईल.

### जिल्हयात चोरीच्या घटनेत लक्षणीय वाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** कोल्हापूर ते नागपूर या रेल्वे प्रवासा दरम्यान अज्ञात चोरट्यांनी पाळत ठेऊन एका प्रवाशाची सोन्या-चांदीचे दागदागिणे असणारी बॅग लंपास केली. त्या बॅगेत १४ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल होता. दरम्यान, या प्रकरणात गणेश शांतीलाल राठी या प्रवाशाने पूर्णा लोहमार्ग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

राठी दाम्पत्य एक्सप्रेसने प्रवास करीत होते. पूर्णा रेल्वेस्थानकावरुन एक्सप्रेस बाहेर पडल्यानंतर या दाम्पत्यास बॅग चोरीस गेल्याची बाब निदर्शनास आली. ही घटनेची चर्चा रेल्वेत खुप होती.

## भागवत मुंडे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानीत




**सोनपेठ,/प्रतिनिधी- :** परभणी जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायत स्तरावर ग्राम विस्तार अधिकारी ते ग्रामपंचायत अधिकारी म्हणून गावच्या विकासासाठी उत्कृष्ट कार्य केल्यामुळे गंगाखेड तालुक्यातील वाघलगांव ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी भागवत मुंडे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून, महाराष्ट्र रत्न सन्मान सोहळा २०२५ ने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना पत्रकार भुवन पुणे येथे दि. ११ ऑक्टोबर रोजी सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला. हा सन्मान त्यांना पुणे येथील नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र या संस्थेच्या वतीने देण्यात आला आहे. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्व मित्र परिवारातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# निर्भीड पत्रकार रत्नदीप शेजावळे आता निर्भीड नगरसेवक बनण्याच्या तयारीत! वॉर्ड क्रमांक १० मधून नगरसेवक पदासाठी इच्छुक

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नागरी हक्क, विकास आणि जनतेच्या प्रश्नांवर निर्भीडपणे लेखणी चालवणारे पत्रकार रत्नदीप शेजावळे आता थेट लोकसेवेसाठी राजकारणात उतरनार आहेत. अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या वॉर्ड क्रमांक १० मधून नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविण्याची त्यांनी घोषणा केली असून, सध्या ते जनतेच्या गाठीभेटी घेत नागरिकांशी संवाद साधत आहेत.

रत्नदीप शेजावळे हे नाव जिंतूर तालुक्यातील प्रत्येक गावात सुपरिचित आहे. अन्यायाविरोधात आवाज उठवणारा, सामान्य नागरिकांच्या समस्या लेखणीद्वारे सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचवणारा हा पत्रकार आता त्या समस्यांचे प्रत्यक्ष निराकरण करण्यासाठी राजकारणात प्रवेश करत आहे. शेजावळे म्हणाले ''पत्रकार म्हणून मी अनेक वर्षे लोकांच्या समस्या मांडल्या, पण त्या प्रश्नांचे खरे समाधान व्हावे यासाठी आता नगरसेवक म्हणून काम करण्याची इच्छा आहे. समाजातील दुर्लक्षित घटक, महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक यांचा आवाज बनण्यासाठी मी या निवडणुकीत उतरलो आहे.''

पत्रकार रत्नदीप शेजावळे यांनी जिंतूर तालुक्यातील २३ गावांना पक्का रस्ता मिळवून देण्यासाठी केलेल्या 'उलगुलान आंदोलनाची' सर्वत्र चर्चा झाली होती. तब्बल दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण लढ्यामुळे शासन यंत्रणा हालचालीस आली आणि संबंधित गावांतील नागरिकांना रस्त्याचा मार्ग मोकळा झाला. त्यांच्या या जनआंदोलनामुळे सामान्य माणसाला न्याय मिळवून देणारा पत्रकार अशी ओळख निर्माण झाली. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. विविध शाळा,



महाविद्यालये आणि संस्थांमध्ये त्यांनी सामाजिक जाणिवा, युवकांचे प्रश्न आणि विकास या विषयांवर व्याख्याने दिली आहेत.

स्थानिक नागरिकांनी त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले असून, प्रभागातील जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी त्यांना पाठिंबा दर्शविला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, ''रत्नदीप शेजावळे हे केवळ पत्रकार नाहीत, तर आमच्या समस्यांसाठी नेहमी लढणारा आवाज आहेत. नगरसेवक म्हणून ते आमच्यासाठी मोठा बदल घडवतील.'' निर्भीड, प्रामाणिक आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सतत लढा देणारा हा तरुण पत्रकार आता नगरसेवकपदासाठी इच्छुक झाला असून, नागरिकांकडून त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

आगामी नगर परिषद निवडणुकीत त्यांचा प्रवेश हा जिंतूर शहरातील राजकारणात नवी उर्जा निर्माण करेल, अशी चर्चा शहरभर सुरू आहे. जिंतूर शहरातील नागरिकांकडून रत्नदीप शेजावळे यांच्या सामाजिक वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत असून, ''निर्भीड पत्रकार आता निर्भीड नगरसेवक'' या घोषवाक्यासह त्यांच्या प्रचाराची सुरुवात झाली आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# समाजात सायबर सुरक्षेची नितांत गरज- आ. मुटकुळे

## शेतकऱ्यांसाठी पोलिस दलाकडून २३ लाख ८१ हजारांची मदत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

आजच्या युगात सर्वजण विविध डीजीटल माध्यमांचा वापर करीत आहेत. अॅन्ड्राईड मोबाईलचा वापर करीत आहेत. परंतु अनेकवेळा चुकीची माहीती किंवा लिंक ओपन केल्यामुळे फसवणुक झाल्याचे उघडकीस येत आहे. त्यामुळे समाजात सायबर सुरक्षेची जनजागृती करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केले. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मी दक्ष या जनजागृती कार्यक्रमाचे देखील त्यांनी कौतुक केले. यावेळी पुरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हिंगोली जिल्हा पोलिस दलाच्यावतीने २३ लाख ८१ हजार २२२ रूपयांचा धनादेश जिल्हाधिकारी यांना सुपूर्द करण्यात आला.

येथील पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात दि १४ आक्टोबर रोजी मी दक्ष या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले की, वरिष्ठांकडून सायबर जनजागृती महिना साजरा करण्याचे आदेश दिले आहेत. सायबर सुरक्षेसाठी जनजागृती आणि सावधता गरजेची आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. सायबर फ्रॉड झाल्यास १९३०,१९४५ या क्रमांकावर त्वरीत संपर्क करावा. यासाठी शाळा, महाविद्यालयात पथनाट्य, कॉर्नर मीटींग, निबंध स्पर्धा, मानवी साखळी आदी कार्यक्रम हाती घेण्यात आले असून महिनाभर हा कार्यक्रम राबवणार आहोत. सर्वानी सायबर सुरक्षा बाळगावी असे आवाहनही केले.



यावेळी हिंगोली पोलिस दलाच्यावतीने एक दिवसाचे वेतन देण्यात आले. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी २३ लाख ८१ हजार २२२ रूपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेकडे देण्यात आला. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, उपअधीक्षक दत्ता केंद्रे, पोनि मोहन भोसले, कार्यालय अधीक्षक राणा पाटणकर यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व पोलिस ठाण्याचे अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठीत नागरिक तसेच पत्रकार यांची उपस्थिती होती.

# आरोग्य यंत्रणेच्या अथक प्रयत्नामुळे संजीवनी अभियानाला देशपातळीवर नामांकन- गुप्ता

## संजीवनी अभियान गौरव पुरस्काराचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

संजीवनी अभियान कार्यक्रमाला देशपातळीवर मानांकन मिळवून देण्याचे काम आरोग्य विभागातील आशाताईपासून सर्व तंत्रज्ञ, परिचारिका, वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ अधिकारी या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे हे शक्य झाले असल्याचे सांगून, हिंगोली जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने संजीवनी अभियान गौरव पुरस्कार सोहळ्याचे आज आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नामदेव केंद्रे, अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विशाल पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दीपक मोरे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये आदींची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील महिलांची संख्या विचारात घेऊन महिलामधील कर्करोगाचे निदान होऊन लवकर उपचार व्हावेत, यासाठी जिल्ह्यात संजीवनी अभियान राबविण्यात आले. या मोहिमेत जिल्ह्यातील महिलांची स्क्रीनींग करण्यात आली. संशयित महिलांची सर्व तपासण्या केल्यानंतर त्यामध्ये ३५ महिलांना कर्करोग झाल्याचे निदान झाले. या सर्व महिलांना वेळीच निदान केल्यामुळे त्यांच्यावर उपचार करणे सोयीचे झाले. शेवटच्या टप्प्यावर रुग्ण गेल्यावर त्याला वाचवणे शक्य होत नाही. या संजीवनी अभियानामुळेच हे शक्य झाले आहे. या सर्व भगिनीच्या आशिर्वादामुळेच अभियानाला देशपातळीवर मानांकन मिळाले आहे. हे सर्व आशाताई, वैद्यकीय अधिकारी, एमपीडब्ल्यू यांनी प्रत्यक्षात फिल्डवर जाऊन महिलांचा डाटा गोळा केल्यामुळे शक्य झाले आहे. हा उपक्रम आता राज्यभर राबविण्यात येत आहे, ही अभिमानाची बाब आहे. आता जिल्हा प्रशासनामार्फत कुपोषण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात स्तनदा महिला, गर्भवती महिलांचा डाटा गोळा करण्यासाठी यंत्रणा विकसित करण्यात येणार आहे. आपणामार्फत हे अभियानही यशस्वी करुन प्रधानमंत्री अॅवार्ड मिळवाल, अशी अपेक्षा व्यक्त करुन जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सर्व गौरवमूर्तीचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल यांनी केले. या संजीवनी अभियान गौरव पुरस्कार सोहळ्यात आशाताईपासून तालुका आरोग्य अधिकारी तसेच अभियानात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहभाग नोंदविलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील आशाताई, एमपीडब्ल्यू, स्टाफ नर्स, सीएचओ, वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचनामे सुलभ व पारदर्शक होण्यासाठी तांत्रिक कर्मचारी द्यावेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे जनिमी खरडून गेल्या आहेत, विहीरीची पडझड आणि गाळ साचला आहे परंतु सदरील माहीती ही तांत्रिक अधिकारी व महसुल ग्राम अधिकारी यांचेशिवाय पारदर्शक होणे कठीण आहे. त्यामुळे पंचनामे सुलभ आणि पारदर्शक होण्यासाठी समितीमध्ये कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियंता तसेच ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश करावा अशी मागणी कृषी सहाय्यक संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी ९यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



मागील महिन्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचा जमिनी खरडून गेल्या आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. याचे पंचनामे करण्यासाठी कृषी सहाय्यकाला आदेश देण्यात आले आहेत परंतु त्यांना तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. जमिनीचा किती इंच, फुटाचा थर वाहून गेला पाहीजे, सदरील जमीन कोणाच्या नावे आहे, त्याचा गट क्र, सर्वे क्र तसेच शेतकरी अल्प, अत्यल्प किंवा बहुधारक आहे याची माहीती ग्राम महसुल अधिकारी यांचेकडेच उपलब्ध असते. तसेच विहीरीचा पंचनामा करतांना पडझड किंवा गाळ साचल्याचे कसे ठरवायचे, काही विहीरी तुडुंब पाण्याने भरलेल्या आहेत. ही एक तांत्रिक बाब असल्यामुळे समितीमध्ये तांत्रिक अधिकारी समाविष्ट करावा. त्यामुळे पंचनामे सुलभ आणि पारदर्शक होतील. निवेदनावर संतोष वाघमारे, श्रीनिवास शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### डॉ आंबेडकर नगर येथे ग्रंथ वाचनाची सांगता



हिंगोली- मातोश्री रमाबाई आंबेडकर चौक डॉ आंबेडकर नगर येथे मागील तीन महिन्यापासून वर्षावास निमित्त बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन अविरतपणे महिला मंडळानी केले. या ग्रंथ वाचनाची सांगता दि १२ आक्टोबर रोजी करण्यात आली. यावेळी महापुरूषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण, पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा सुखदेव बलखंडे, अनिल पुंडगे, अरविंद धाबे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अशोक सुरडकर यांनी केले. आभार संजय लबडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमाबाई महिला मंडळाचा विशेष सहभाग होता. भीमराज युवक मंडळाचे सुनील खिल्लारे, मंगेश नेतने, दत्ता धुळे, सोनु धबाले, चंद्रकांत लोखंडे, मोरे, जावळे, रोहन ढगे, साहेबराव काशिदे, किरण खिल्लारे, अंभोरे आदींनी परिश्रम घेतले.

### औंढा येथे महामानवांना अभिवादन

हिंगोली- शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात धम्मचक्र प्रवर्तन दिन मंगळवारी( ता.१४) साजरा करण्यात आला. यावेळी तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. पोलिस उपनिरीक्षक दत्ता कानगुले यांच्या हस्ते पंचशील ध्वजवंदन झाले. यावेळी नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख, माजी नगराध्यक्ष एस पी कनकुटे, नगरसेवक साहेबराव देशमुख, नगरसेविका दिपाली पाटील, नगरसेविका जयाताई देशमुख, पोलीस उपनिरीक्षक आफसर पठाण, सोहळा समितीचे अध्यक्ष नागेश गायकवाड, उपाध्यक्ष सौरभ मुळे, सचिव श्रीकांत इंगळे, कार्याध्यक्ष अवी खंदारे, सहकार्याध्यक्ष बंटी मुळे, यशवंत साळवे, उत्तम साखरे, आशिष मुळे, अवि खंदारे, रक्षक गायकवाड, बाळासाहेब साळवे, जी. डी. मुळे, वसंत मुळे, विजयमाला मुळे, गणेश देशमुख, राम मुळे, गणेश पाटील, राम नागरे, विष्णू पवार, आनंद झांजरी सुनील खंडागळे, कपील साखरे, संगीता मुळे, प्रा. रमेश वाव्हळे, सुमेध मुळे, चंद्रमुनी पाईकराव, रवी डोंगरदिवे, अँड स्वप्निल मुळे, सदानंद मुळे, राजकुमार जोंधळे, सचिन गव्हाणे, अरविंद मुळे, आकाश सुतारे,आशिष मुळे, नितीन गव्हाणे, आदींची उपस्थिती होती. प्रस्तावना व सूत्रसंचालन बाबा डांगे व विनोद साळवे यांनी केले. दुपारी तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक शहरातील मुख्य मागनि काढण्यात आली. पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी मिरवणुकीस बंदोबस्त ठेवला होता.

# जिल्हाधिकारी गुप्ता यांनी घेतला विविध विभागाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पाणी आरक्षणाबाबत चर्चा करण्यासाठी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत टंचाई कालावधीसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी जिल्ह्यातील प्रकल्पातील पाणी आरक्षणाबाबत तसेच आकस्मित पाण्याचे आरक्षणाबाबत चर्चा करण्यात आली. तसेच नागरिकांना पिण्याचे पाणी व पशुंना पिण्याचे पाणी आरक्षणाबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

यावेळी उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता ए. बी. जगताप, पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता आर. पी. गरुड, लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अण्णाराव कांबळे आदी उपस्थित होते. राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४ बाबत जागरुकता निर्माण करणे तसेच तंत्रज्ञान आधारित लॉजिस्टीकसाठी स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा लॉजिस्टिक समन्वय समितीची स्थापना करण्यात आली.

तसेच प्रधानमंत्री यांच्या विकसित भारत २०४७ या देशाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयपूर्तीच्या उद्दिष्टासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र राज्याची औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक एक ट्रिलीयन डॉलर करण्याचे ठरविले आहेत. त्याअनुषंगाने अभ्यासगट तयार करण्यात आले आहे. त्याचाच भाग म्हणून बँक आणि प्रायवेट इंडस्ट्रीयल टाऊनशीप प्रोमोशन ही समितीही जिल्हाधिकारी गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली. यावेळी नगर रचना विभागाचे सहायक संचालक, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी, भूमी अभिलेखचे अधीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महावितरणचे अधीक्षक अभियंता, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक, उद्योग निरीक्षक, उद्योग संघटनेचे ज्ञानेश्वर मामडे आदी उपस्थित होते. कळमनुरी तालुक्यातील तुप्पा, सोडेगांव, कडपदेव येथील ३३ केव्ही उपकेंद्रासाठी तसेच वाकोडी येथील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी जागा तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील तामटीतांडा येथील ३३ केव्ही उपकेंद्र व जलालदाभा येथील ४००/२०० केव्ही उपकेंद्रासाठी आणि सेनगाव तालुक्यातील पानकनेरगाव येथील ४००/२०० केव्ही उपकेंद्राच्या जागा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सद्यस्थितीचा आढावा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला. यावेळी महावितरण व महापारेषणचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**



काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी आज मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्या प्रवेशामुळे हिंगोलीतील राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे बोलले जात आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत हिंगोली विधानसभेची जागा महाविकास आघाडीने उबाठा शिवसेनेला सोडली होती. तेव्हापासून काँग्रेसचे माजी भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली होती. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्यांनी अपक्ष म्हणून हिंगोली विधानसभा लढवली होती. परंतु त्यामध्ये त्यांचा पराभव झाला.

अनेक दिवसांपासून माजी आ. भाऊराव पाटील हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. यासंदर्भात तीन दिवसांपूर्वी त्यांनी गोरेगाव येथे त्यांच्या समर्थकांची बैठक घेवून शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला होता. तसेच शिंदेसेनेचे आ. संतोष बांगर यांनीही त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर माजी आ. गोरेगावकर यांनी पत्रकार परिषदेत शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जाहीरपणे सांगितले होते.

मंगळवारी दुपारी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंत्री गुलाबराव पाटील, आ. आ संतोष बांगर, माजी जि प उपाध्यक्ष सुनील पाटील गोरेगावकर, युवासेना जिल्हाप्रमुख राम कदम, संजय देशमुख, द्वारकादास सारडा, मदन शेळके, माजी सभापती फकीरराव मुंढे, धीरज देशमुख, गजानन पोहकर, शेख नईम शेख लाल९९ आदीची उपस्थिती होती. माजी आ. गोरेगावकर यांच्या पक्षप्रवेशामुळे शिवसेनेला हिंगोलीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत बळ मिळणार असल्याची चर्चा होत आहे.

# अतिवृष्टीतील नुकसानग्रस्त एकल महिला कुटुंबाला आपत्कालीन राशन व औषधीचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

अजीम प्रेमजी फाऊंडेशन व उगम ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मण नाईक तांडा, काळापाणी तांडा, संघनाईक तांडा, रेवणसिद्ध तांडा, पवार तांडा व लोहरा बू. येथील १४० कुटुंबाला दिवाळीसाठी राशन पुरविण्यात आले.

हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे बहुतांश कुटुंबाचे आर्थिक नियोजन कोडमडले आहे. त्यामुळे सदरील गावातील भूमिहीन, अपंग, मंजूर, विधवा, परितक्ता या कुटुंबाला दिवाळी साजरी करण्यासाठी आवश्यक राशन किट व औषधी वाटप करण्यात आली आहे. यावेळी उगम ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव, प्रकल्प संचालक दिशांत पाईकराव, सुशिला पाईकराव, रवींद्र पवार(सरपंच लक्ष्मण नाईक तांडा), चंद्रकांत बगाटे (सरपंच लोहरा बू.) यांच्या हस्ते किट वाटप करण्यात आल्या. डॉ. संदीप घुगे यांनी वाटप करण्यात आलेल्या औषधांची माहिती व वापर याविषयी माहिती दिली. वाटपासाठी कार्यक्रम व्यवस्थापक विकास कांबळे, धनंजय पडघन, भीमराव भिसे, अमोल माहोरे, ओंकार भालेराव, भीमराव पाईकराव, राम खंदारे, भूषण पातोडे, सुमेध हरणे व विजय पवार यांनी सहकार्य केले.

# सेनगावात आशा कर्मचाऱ्यास मारहाण, विनयभंग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

सेनगाव तालुक्यातील एका गावात संशयित क्षय रूग्णाचे थुंकीचे नमुने घेण्यासाठी गेलेल्या आशा सेविकेला मारहाण करून विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दोघांवर नर्सी नामदेव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींचा शोध पोलिस घेत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील एका गावामध्ये आशा कर्मचारी दि १३ आक्टोबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास संशयित क्षय रूग्णांचे थुंकीचे नमुने घेण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी आकाश धाबे व करण धाबे हे दोघे त्या गावात आले. त्यांनी आशा कर्मचाऱ्याला शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. तुम्हाला संशयित क्षयरूग्णाची विचारपूस करण्याचा काय अधिकार आहे असे म्हणत शिवीगाळ केली.दरम्यान वाद वाढू नये यामुळे आशा कर्मचारी घरी जाण्यासाठी निघाल्या असतांना दोघांनी त्यांचा पाठलाग करून त्यांच्या पर्समधील मोबाईल हिसकावून घेतला तसेच तीन हजार रूपये जबरीने काढून घेतले. यावेळी मारहाण देखील करण्यात आली. या मारहाणीत त्या जखमी झाल्या. त्यानंतरही त्यांचा रस्ता अडवून पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांचा विनयभंगही केला. या प्रकरणी आशा कर्मचारी यांनी रात्री नर्सी नामदेव पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी आकाश धाबे व करण धाबे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि अशोक घारगे, उपनिरीक्षक जाधव यांचे पथक करीत आहे.

# आरक्षण जाहीर होताच दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागणार

जुनेद शेख
**हदगाव, दि. १४ ऑक्टोबर-**





जिल्हा परिषद गट आणि गणाचे आरक्षण जाहीर होताच तालुक्यात राजकीय रंगाची उधळण सुरू होत आहे. त्याअनुषंगाने राजकीय खेळाडू आता मैदानात उतरण्यासाठी कंबर कसून तयार झाले आहेत. तथापी जिल्हा परिषद गट व गणाच्या आरक्षणामुळे कहीं खुशी - कहीं गम अशी अवस्था निर्माण झाली आहे. राजकीय वर्चस्व असलेल्या ठिकाणी कोणत्या नेत्याचा किती कस राजकीय डावावर लागेल हे येणारा काळच ठरवेल.

हदगाव तालुक्यात जिल्हा परिषदेचे सहापैकी तीन गट महिलांसाठी राखीव झाल्याने तालुक्यातील राजकीय समीकरण बदलणार आहेत. जिल्हा परिषद साठी होणाऱ्या निवडणुकीमध्ये काँग्रेस, शिवसेना (उबाठा), शिवसेना (शिंदे गट), भाजपा, राष्ट्रवादी (शरद पवार गट) या पाचही पक्षांच्या कार्यकर्त्यांची उमेदवारी मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्सीखेच सुरू आहे. हदगाव तालुक्यातील जिल्हा परिषद सहा ही गटात युती न झाल्यास चौरंगी लढत राहील असे राजकीय जाणकारांकडून बोलले जात आहे. पक्षीय बलाबल पाहता गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत काँग्रेसकडे ३ व शिवसेना कडे ३ असे समान पक्षीय बलाबल होते. मनाठा, तामसा, पळसा हे तीन गट काँग्रेसकडे तर निवघा, रुई धानोरा, आष्टी हे तीन गट शिवसेनेकडे होते पण मागील काही काळामध्ये मोठे सत्तेनाट्य घडल्याने राजकीय वातावरण ढवळून निघाले. ज्याचा थेट परिणाम होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीवर नक्कीच होणार असल्याचे डोळस चित्र पाहावयास मिळणार आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत माजी आ. जवळगावकर यांचा पराभव जरी झाला तरी त्यांचे व काँग्रेस पक्षाचे प्रभाव मतदार संघात चांगल्या प्रकारे दिसून येते. खा. आष्टीकर यांची पण मतदार संघात चांगलीच पकड असल्याचे बोलले जाते. सध्या स्थितीला केंद्रात व राज्यात युतीचे सरकार असून विद्यमान आ. कोहळीकर हे युतीचेच आमदार असल्याने त्यांच्यासाठीही मतदारसंघात अनुकूल परिस्थिती राहणार असल्याचे राजकीय जाणकारांकडून बोलले जात आहे. सर्वच राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून ही निवडणूक सर्वच राजकीय नेत्यांसाठी वर्चस्वाची लढाई ठरणार आहे.

# झाडा-झुडपांची जेसीबी मशीनने साफसफाई सुरू

तभा वृतसेवा
**माहूर, दि. १४ ऑक्टोबर-**

माहूर शहरातील वार्ड क्र.०१ कपिलनगर मधील पांडवलेणी व बाबा सोनापीर दर्गाह रोड परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा बाजूकडील भागात मोठ्या प्रमाणात वाढलेली काटेरी झाडेझुडपे तोडून परीसर स्वच्छ करण्याची मागणी युवासेना शहर प्रमुख (एशिं) राणा ऊर्फ विजयसिंह हजारी यांचेसह वार्डातील अनेक नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाकडे दि.१३ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली असता या निवेदनाची तातडीने दखल घेत आज १४ रोजी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी स्वतः याठिकाणी उभे राहून जेसीबी मशीन द्वारे अस्ताव्यस्त वाढलेली झाडेझुडपे तोडून परिसर साफसफाईचे काम सुरू केल्याने नागरिकांमधून नगराध्यक्ष दोसानी यांचेसह मुख्याधिकारी विवेक कांदे,निवेदनकर्ते युवासेना शहर प्रमुख राणा व या संदर्भातील बातमी प्रकाशित केल्याबद्दल दै.तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी बजरंगसिंह हजारी यांचे आभार मानले आहेत.

**तरुण भारत इफेक्ट**



शहरातील कपीलनगर मधील नागरी वस्तीपासून बाबा सोनापीर दर्गाह व पांडवलेणी या धार्मिक व पौराणिक स्थळाकडे जाण्यायेण्याच्या वर्दळीच्या रस्त्याच्या दुतर्फा बाजूला काटेरी झाडेझुडपे मोठ्या प्रमाणात वाढून एकप्रकारे जाळे तयार झाले होते. हा परिसर अगदी जंगल व डोंगर दरीला लागून असल्याने या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट, रानडुक्कर या हिंस्र वण्याप्राण्यांचा व सरपटणाऱ्या विषारी प्राण्यांचा मुक्त संचार सुरू असल्याने या झाडाझुडुपांच्याआड लपून बसलेल्या सदरील हिंस्र वन्यप्राण्यांचा या रस्त्यावरुन जाणे येणे करणाऱ्या वाहनचालकावर व पादचाऱ्यावर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने रोड लगतच्या परिसरात वाढलेली झाडेझुडपे तोडुन तो परिसर स्वच्छ करण्यात यावा, अशी मागणी युवासेना शहर प्रमुख राणा यांचेसह वार्डातील रहिवाशांनी नगरपंचायत प्रशासनाकडे केली होती.त्या मागणीची नगरपंचायत प्रशासनाने तातडीने दखल घेत नगराध्यक्ष दोसानी यांनी या परिसरात स्वतः हजर राहून नगरपंचायत कडून जेसीबी मशीन लावून या परिसरात घनदाट वाढलेली झाडेझुडपे तोडून साफसफाईचे काम सुरू केल्याने नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी विवेक कांदे तथा विकासप्रिय, स्वच्छताप्रिय नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचे वार्डातील रहिवाशांनी आभार मानले आहेत.

## भोकर येथे पेरकेवाड समाजातील गूणवंताचा सत्कार व परिचय मेळावा

**भोकर**-पेरकी पेरकेवार पेरकेवाड समाजातील गूणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व परिचय मेळावा दि.२६ आँक्टोंबर भोकर येथील गणराज पॅलेस फंक्शन हॉल येथे आयोजीत करण्यात आल्याची माहिती मेळाव्याचे संयोजक शासकिय कंत्राटदार गोविंद उल्लेवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. पेरकी पेरकेवार पेरकेवाड हा अल्पसंख्याक समाज असून या समाजातील विद्यार्थी शिकून मोठे अधिकारी व उद्योजक झाली पाहिजे त्याकरिता पेरकी पेरकेवार पेरकेवाड समाजाच्या वतीने भोकर येथे प्रथमच भव्य असा गूणवंताचा सन्मान व परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या मेळाव्यास आदिलाबादचे आ.शंकरअण्णा पायली माजी आ.गंप्पा गोवर्धन आ.श्रिजया अशोकराव चव्हाण उपस्थित राहणार आहेत या मेळाव्यात नांदेड जिल्ह्यातील पेरकी पेरकेवार पेरकेवाड समाजातील गूणवंत विद्यार्थी प्रशासनात काम करित असलेले कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती मेळाव्याचे संयोजक कंत्राटदार गोविंद उल्लेवाड यांनी दिली पत्रकार परिषदेला समाजातील बालाजी पिंगलवाड बाबूराव गोपतवाड बालाजी शानमवाड मारोती पिंगलवाड संभाजी आलेवाड अशोक अनगूलवार अँड सूरेश पनसवाड सटवाजी शेंडगे मारोती बेरदेवाड संभाजी आलेवाड प्रकाश बच्चेवाड राजेश शिंगनवाड आदि समाजबांधव उपस्थित होते.

## अर्धापूरात उद्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अजित पवार गटाची आढावा बैठक

**अर्धापूर**- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने अर्धापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक दि. १६ ऑकटांबर रोजी सकाळी १० वाजता मातोश्री मंगल कार्यालय तामसा रोड अर्धापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या आढावा बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर संबोधित करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर हे राहणार आहेत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ.मोहनराव हंबर्डे, माजी आ.अविनाश घाटे, माजी आ. सुभाष साबणे, राष्ट्रवादी काँग्रेस नांदेड जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, नांदेड महानगर कार्याध्यक्ष माधव पावडे, युवक जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे व जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशचे सर्व पदाधिकारी जिल्ह्याचे सर्व पदाधिकारी, विधानसभा अध्यक्ष, सर्व फ्रंन्ट सेलचे जिल्हाध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अर्धापूर तालुकाध्यक्ष आत्माराम पाटील कपाटे, शहराध्यक्ष शेख साबेर यांनी केले आहे.

## पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आज आयोजन

**नांदेड**-नांदेड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व दिगांबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून दिगांबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर येथे पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजक तसेच शाळा व महाविद्यालय तसेच इतर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी उद्या बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ.रा.म. कोल्हे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , आनंदनगर रोड, बाबा नगर नांदेड कार्यालयाचा ई-मेल आयडी nandedrojgar01gmail.com आणि कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व योगेश यडपलवार यांचा क्रमांक ९८६०७२५४४८ यावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## भोकर पंचायत समितीचे आरक्षण सोडत जाहिर

**भोकर**-भोकर पंचायत समिती आगामी सार्वत्रीक निवडणूकिच्या अनूषंगाने आज दि.१३ आँक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयात प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार विनोद गूंडमवार व उपविभागीय अधिकारी व नियंत्रण अधिकारी प्रविण मेंगशेट्टी यांच्या प्रमूख उपस्थितीत तालूक्यातील सहा गणाचे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.देवठाणा गण अनू.जाती पाळज गण ना.मा.प्र.भोसी गण अनू.जमाती रिठ्ठा गण सर्वसाधारण महिला सोनारी गण सर्वसाधारण महिला पिंपळढव गण सर्वसाधारण महिला साठी आरक्षित करण्यात आले असून या आरक्षण सोडती बाबत कोणाची काही हरकती असल्यास दि.१४ ते १७ आँक्टोबर पर्यंत या कालावधीत हरकती तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये नोंदविता येणार आहेत.

# मुक्रमाबाद विभागात वाहून गेलेल्या पशुधनाचे पंचनामे करून बाजारभावाप्रमाणे मदत द्या

तभा वृतसेवा
**मुक्रमाबाद, दि. १४ ऑक्टोबर-**

आँगष्ट महिन्यात लेंडी नदीला आलेल्या महापुरात मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांची शासनाच्या निकषाप्रमाणे पशू पालकांना मदत देण्यात आली. शासानाकडे वारंवार तक्रारी करूनही आजतागायत पुरात वाहून गेलेल्या जनावरांचे शासनाकडून अजूनही पंचनामे करण्यात आलेले नाहीत किंवा मदतही करण्यात आलेली नाही. वाहून गेलेल्या जनावरांचा पंचनामा करून तातडीने मदत करण्यात यावी अशी मागणी ठाकरे सेनेचे मुखेड विधानसभा प्रमुख मन्मथ खंकरे. व बालाजी खंकरे , यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदना द्वारे केली आहे.



मुखेड तालुक्यात आँगष्ट महिन्याच्या १७ ते १९ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीत मुक्रमाबाद येथील लेंडी नदीला प्रचंड मोठा महापुर येऊन पशू पालकांची मोठ्या प्रमाणात हाणी झाली. यात गोठ्यात बांधलेली लाखो रूपये किंमतीची काही दुधाळ जनावरे ही जाग्यावरच पाण्यात बुडून मृत्यू पावली तर अनेक जनावरे, शेळी ,कोंबड्यांचा वाहून जाऊन मृत्यू झाला. उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, मंडळ अधिकारी , तलाठी व पशू वैधकीय अधिकारी यांच्या समक्ष पुरात जाग्यावर मृत्यू पावलेल्या जनावरांचा व वाहून गेलेल्या जनावरांची पहाणी करण्यात आली व पशू संवर्धन विभागाकडून मृत्यू जनावरांचे प्रमाणपत्रही देण्यात आले. पण दुग्ध व्यवसाय पुन्हा चालू करण्यासाठी शासनाने आम्हाला पुरात वाहून गेलेल्या जनावरांचे चालू भावाप्रमाणे आर्थिक मदत करावी. आर्थिक मदत येत नसेल तर दुधाळ जनावरे उपलब्ध करून आमचे पुनर्वसन करावे. व गोठ्यातील व नुकसान झालेल्या भागातील नुकसान भागाचे पंचनामे करून आर्थिक मदत मिळणे अपेक्षित होते. पण शासना कडून अजून शेतकऱ्यांना व पशू पालकांना कसलीच आर्थिक मदत मिळाली नाही. हे, दुर्देव म्हणावे लागेल.

शासनाने पुरात वाहून गेलेल्या जनावरांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना व पशू पालकांना तात्काळ आर्थिक मदत करावी अन्यथा १५ आँक्टोंबर पासून आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचे बालाजी खंकरे व मन्मथ खंकरे, यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे कळविले आहे.

**मदत मिळणार नाही तोपर्यंत अन्नत्याग: मन्मथ खंकरे**

माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह हा दुग्ध व्यवसायावरच अवलंबून होता. पण लेंडी नदीच्या पुरात गाय व म्हैसी वाहून गेली असल्यामुळे आज दुधाचा व्यावसाय बंद झालेला आहे. शासन वाहून गेलेल्या जनावरांची कसलीच मदत करत नाही. जोपर्यंत मदत मिळणार नाही तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा मन्मथ खंकरे यांनी दिला.

**जनावरांचे पैसे देत नाही, आम्ही जगायचे कसे : बालाजी खंकरे**

मोठ्या कष्टाने दुग्ध व्यावसाय उभारला होता. पण लेंडी नदीच्या पुरात गोठ्यातील जनावरांचा मृत्यू झाला तर काही वाहून जाऊन मृत्यू झाल्यामुळे पुर्ण व्यावसाय उद्वस्त झाला. आज उपास मारीची वेळ आलेली आहे. शासन वाहून गेलेल्या जनावरांचे पैसे देत नाही. आम्ही जगायचे कसे. जोपर्यंत आम्हांला पुरात वाहून गेलेल्या जनावरांचे पैसे भेटणार नाहीत किंवा दुधाळ जनावरे भेटणार नाहीत तोपर्यंत अन्नत्याग करणार यात आमचा मृत्यू झाला तरी चालेल असे बालाजी खंकरे यांनी म्हणटले बाहे.

# भोकर पालीकेच्या निवडणूकीसाठी राजकिय पक्षांकडून उमेदवाराची चाचपणी

अरुण डोईफोडे
**भोकर, दि. १४ ऑक्टोबर-**

भोकर नगर परिषदेच्या निवडणूकीसाठी अकरा प्रभागातून बावीस उमेदवारांना निवडून द्यावयाचे असल्याने सर्वच प्रभागात शेकडो उमेदवार ईच्छूक असल्याचे निदर्शनास येते.भाजपा, अजित दादा पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस, शिंदे गट शिवसेना, काँग्रेस, शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस, वंचित बहूजन आघाडी, एमआयएम आदी सर्वच राजकिय पक्षांकडून ईच्छूकांनी निवडणूक लढविण्याची तयारी करताना दिसत आहेत. आजपर्यंतच्या निवडणूकीत काँग्रेस -भाजपा यांच्यात खरी लढत झाल्याचे पहावयास मिळाले. प्रभागातील सदस्याचे आरक्षण सोडत जाहीर होताच ईच्छूकांनी आपआपल्या प्रभागात मतदारांचे गाठी भेटी घेण्यास सुरु केले आहेत.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले आहे. नगराध्यक्ष पद हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी जाहिर करण्यात आल्याने थेट जनतेतून नगराध्यक्ष पदासाठी प्रथमच होणार असल्याने सर्वसाधारण व ओबिसी मधील बलाढ्य उमेदवार निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी करीत आहेत. अनेक दिवसापासून मोठ्या तळमळीने पक्षाचे काम केलेल्या कार्यकर्त्यांना संधी मिळेल या आशेने कार्यकर्ते पदाधिकारी उमेदवारी आपल्याला मिळावी म्हणून पक्षातील वरिष्ठांकडे फिल्डींग लावण्याचा खटाटोप सूरु ठेवला आहे. राजकिय पक्षाने नवीन चेहऱ्यांना संधी देण्याचा प्रयत्न केला तर मतदार नविन उमेदवाराला पसंती देतील अशी राजकीय वर्तूळात चर्चा आहे. जून्या नगरसेवकांवर मतदारांची नाराजी दिसून येते. काही नगरसेवकांनी वार्डाकडे लक्ष दिले नाही, समस्या जाणून घेतल्या नाही. यामूळे नविन चेहरे निवडणूक रिंगणात उतरल्यास निश्चित मतदारांचा कौल मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येते. भोकर शहरात विविध विकासात्मक कामे करण्यात आली, अनेक विकास कामे चालू आहेत. माजी मूख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा मतदार संघ असल्याने झपाट्याने विकासात्मक कामे करण्यात आली. नगरपरिषदेवर अनेक वर्षापासून वर्चस्व राहिले. आगामी होणाऱ्या निवडणूकित भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस,शिवसेना,वंचित बहूजन आघाडी आदी राजकिय पक्षांनी आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी निवडणूकित बलाढ्य उमेदवारांच्या शोधात आहेत. जनमानसात चांगली प्रतिमा असलेला वैचारिक सामान्यांची प्रश्न सोडवणारा स्वच्छ उमेदवार दिल्यास मतदारही कसलाही विचार न करता भरघोस मते मिळवून देतील, पैशाच्या जोरावर राजकारण करु पाहणाऱ्यांना मात्र मतदारांनी त्याची जागा दाखवतील. तिकीट मिळविण्यासाठी काही हौसे- गौसे, सामाजीक भान नसलेले कार्यकर्ते देखील उमेदवारी लढविण्याची भाषा करीत आहेत. सर्वच राजकिय पक्षांनी उमेदवारी देताना प्रभागात परिचित असलेला उच्चशिक्षित, सामाजीक भान असलेला सामान्य लोकांची समस्या सोडविणारा उमेदवार द्यावा अशी अपेक्षा मतदार करित आहेत.

# आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव जलसाचे जोरदार सादरीकरण

तभा वृतसेवा
**नवीन नांदेड, दि. १४ ऑक्टोबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ' २०२५ युवक महोत्सवामध्ये आज दि.१४ ऑक्टोबर रोजी क्रांतिवीर बिरसा मुंडा कला मंचावर जलसा या आंबेडकरी गीतांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये विद्यापीठ परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यामधून अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला. त्यामध्ये प्रामुख्याने कंधार येथील शिवाजी महाविद्यालय, नांदेड येथील यशवंत महाविद्यालय, लातूर येथील दयानंद महाविद्यालय यासह इतरही अनेक महाविद्यालयाने यामध्ये सहभाग नोंदवला.

युवक महोत्सवामध्ये क्रांतिवीर बिरसा मुंडा कला मंचावर पारंपरिक जलसा या लोककला प्रकाराचे अप्रतिम दर्शन घडले. महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या जोशपूर्ण आणि कलात्मक सादरीकरणाने प्रेक्षकांची दाद मिळवली. दयानंद फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या जलसाचे बोल होते सिंहापरी जन्मला या भुवरी, देऊनिया ललकारी ललकारी... मुख्य जलसा गायक आनंद रामदासे, साहगायक अनिकेत शितोळे, दिशा राठोड, वैष्णवी जगदाळे, श्रीलक्ष्मी पाटनूरकर, आदिती महाजन आणि अनिकेत रामदासे होते. वाद्यविभागात हार्मोनियमवर विश्वजीत पांचाळ, ढोलकीवर धम्मदिप सपकाळ आणि झांजवर आदित्य गोडे यांनी जलसाला सुरेल वादनाची रंगत दिली. तर श्री शिवाजी महाविद्यालय, कंधारच्या विद्यार्थ्यांनी गावामध्ये गाव आहे मधु गाव, तिथे जन्मले भिमराव सखी बाई गं... माय त्यांची माता, भिमराव झाला त्याचा पिता, झाला गरीबांचा नेता सखी बाई गं... या प्रेरणादायी गीताने सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. या जलसात हार्मोनियमवर अमोल वानखेडे आणि विश्वा कदम, ढोलकीवर डिगांबर वंजे तसेच झांजवर नामदेव रुंजे यांनी वादन केले.महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या जलसांमधून परंपरा, शौर्य, समाजजागृती आणि सांस्कृतिक एकात्मतेचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळाला. प्रेक्षकांनी या उत्स्फूर्त सादरीकरणाला भरभरून दाद देत कलाकारांना उभे राहून टाळ्यांचा वर्षाव केला.उद्या दि. १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ठीक साडेबारा वाजता युवक महोत्सवाचा समारोप होणार आहे. याप्रसंगी स्पर्धेमधून प्रथम द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना आता विद्यार्थी संघाला पारितोषिकाची वितरण करण्यात



येणार आहे. पारितोषिक वितरण प्रसंगी समारोपाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाची कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे राहणार आहेत. तर प्रमुख उपस्थिती मध्ये नांदेडचे पोलीस महानिरीक्षक श्री शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, छत्रपती संभाजीनगर येथील तंत्रशिक्षणाची सहसंचालक डॉ. किरण लाडाने, सोलापूर येथील सकाळ पेपरचे संपादक सिद्धाराम पाटील, मुंबई येथील सनरायझर्स प्रोसेसिंग इंडस्ट्रीचे संचालक निळकंठ चौधरी इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ज्ञानतीर्थ २०२५ युवक महोत्सवामध्ये साहित्यिक प्राध्यापक भास्कर चंदनशिवे विचार मंच क्रमांक चारवर वाद-विवाद स्पर्धा घेण्यात आल्या. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० रोजगाराभिमुख आहे का हे धोरण अनुकूल आहे किंवा अनुकूल नाही अशा दोन्हीही बाजूने उपस्थित सहभागी विद्यार्थ्यांनी वादविवाद केला आहे यामध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.

# आरोग्य सेवेत दिरंगाई केल्यास कुणाचीही हयगय केली जाणार नाही : आ. बोंढारकर

तभा वृतसेवा
**नवीन नांदेड, दि. १४ ऑक्टोबर-**

ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याशी खेळाल आणि आरोग्य सेवा पुरवण्यात हयगय कराल तर कोणाचीही परवा केली जाणार नाही असा सज्जड इशारा आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आरोग्य विभागाच्या बैठकीत दिला आहे.



नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली आज नांदेड तालुक्यातील आरोग्य विभागाची नांदेड शासकीय विश्रामगृहात आढावा बैठक घेण्यात आली . यावेळी नांदेड तालुक्यातील आरोग्य विभागाच्या प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र , उपप्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरोग्य सेवेशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक बाबीचा बारकाईने त्यांनी आढावा घेतला. प्राथमिक आरोग्य केंद्रावर हजर न राहणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना त्यांनी यावेळी खडे बोल सुनावले . जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका नांदेड तालुक्याला मोठ्या प्रमाणात बसला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न भविष्यात अधिक निर्माण होण्याची शक्यता आहे. बदलते वातावरण आणि निर्माण झालेल्या अतिवृष्टी यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील ही नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची अधिक शक्यता बळावल्याने आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपले मुख्यालय सोडू नये . येथे येणाऱ्या प्रत्येक गरजू रुग्णांवर तातडीने इलाज करावेत . आरोग्य सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सरकारकडे पाठपुरावा करू मात्र ज्या साहित्य सामुग्रीची आपल्याला कमी आहे त्याची माहिती आपण वरिष्ठांना आणि लोकप्रतिनिधींना कळवा आणि जनतेची सेवा प्रामाणिकपणा करा अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रवीण मुंडे,मेडिकल ऑफिसर डॉअमजद सर,डॉ.गुडपे, डॉ. अचमवाड मॅडम,डॉ.लोहगावे यांच्यासह नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील तालुका आरोग्य अधिकारी, मेडिकल ऑफिसर आणि समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते.